# प्रकरण तिसरे
# आशयघटकानुसार पाठनियोजन

३.१ प्रस्तावना

३.२ पाठनियोजन

३.२.१ व्याख्या

३.२.२ पाठ नियोजनाची गरज/आवश्यकता

३.२.३ पाठनियोजनाचे महत्त्व

३.२.४ दैनंदिन पाठाची उद्दिष्टे

३.२.५ दैनंदिन पाठ नियोजन

३.२.६ पाठाच्या पायऱ्या

३.२.६.१ प्रचलित पाठाच्या पायऱ्या

३.३ आशयघटक

३.३.१ आशयाचा अर्थ

३.३.२ आशयाच्या व्याख्या

३.३.३ आशयाची गरज

३.३.४ आशयाचे प्रकार

३.४ आशयघटकाची माहिती

३.४.१ कल्पना

३.४.१.१ कल्पनेची व्याख्या

३.४.१.२ कल्पनांचे प्रकार

३.४.१.३ भाषेमध्ये कल्पनेचे महत्त्व

३.४.१.४ कल्पनेचे  शैक्षणिक महत्त्व

३.४.२ भावना

३.४.२.१ व्याख्या

३.४.२.२ भावनेचे स्वरुप

३.४.२.३ भावना आणि प्रेरणा

३.४.२.४ भावनेची कार्ये

३.४.२.५ भावनेची वैशिष्ट्ये३.४.२.६ भाषेत भावनेचे महत्त्व

३.४.२.७ भावनेचे शैक्षणिक महत्त्व

३.४.३ विचार

३.४.३.१ व्याख्या

३.४.३.२ विचारप्रक्रियेतील घटक

३.४.३.३ विचारांचे प्रकार

३.४.३.४ विचारांची प्रतीके

३.४.३.५ विचारप्रक्रियेचे प्रकार

३.४.३.६ भाषेमध्ये विचाराचे महत्त्व

३.४.३.७ विचारप्रक्रियेचे शैक्षणिक महत्त्व

३.५ समारोप

# प्रकरण तिसरे

# प्रकरण तिसरे
# आशयघटकानुसार पाठनियोजन

## ३.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठी विषयामध्ये आशयघटकानुसार पाठनियोजनाचा शिक्षक प्रशिक्षणार्थींच्या वर्गांतर्गत अध्यापनावर होणारा परिणाम-एक अभ्यास या संशोधन विषयामध्ये येणाऱ्या संज्ञा, त्यांचा अर्थ स्पष्ट केला आहे.

## ३.२ पाठनियोजन

कोणतेही अध्यापन यशस्वी व परिणामकारक करायचे असेल तर अध्यापनाचे पूर्वनियोजन करणे अत्यंत आवश्यक असते. विविध उद्दिष्टे योग्य रीतीने साध्य व्हावीत म्हणून अध्यापन करावयाच्या पाठ्यांशाचे नियोजन करणे महत्त्वाचे असते. एका तासिकेत शिकविण्यासाठी निर्धारित केलेली पाठ्यवस्तू म्हणजे पाठ्यांश. पाठ्यांशाचे अध्यापन कसे करायचे याचे नियोजन म्हणजेच पाठनियोजन होय.

**३.२.१ व्याख्या** - (Definition of Lesson Plan )

**पाठनियोजन** - Lesson Plan

१) पाठाचे वर्गात अध्यापन करण्यापूर्वी नियोजन करणे म्हणजे पाठनियोजन होय[१].

२) A lesson plan is a teaching outline of the important points arranged in the order in which they are to be presented. It may include objectives, questions to be asked, references to materials, assignments etc.

पाठनियोजन म्हणजेच उद्दिष्टांचे विचारपूर्वक नियोजन, प्रभावी अध्ययन अनुभूतीची योजना व त्यांच्या पडताळणीसाठी योग्य मूल्यमापन साधनाचा वापर यांची सांगड घालणारा सुसंघटित आराखडा असे म्हणता येइल.[२]

**शेटकर गणेश, जोशी शोभना**

15619

AKR. B... ...R LIBRARY
SHIVAJI ... KOLHAPUR

३) "अध्यापनाचा सविस्तर आराखडा तयार करण्याची प्रक्रिया म्हणजे पाठनियोजन होय."

### ३.२.२ पाठ नियोजनाची गरज/आवश्यकता

प्रत्येक शिक्षकाला पाठ नियोजनाची गरज असते.

१) पाठ नियोजनामुळे वेळेची बचत होते.

२) पाठ नियोजनामुळे अध्यापनात सुसंघटितपणा येतो.

३) पाठ नियोजनामुळे पाठाचा संस्कार व्यवस्थितपणे होतो.

४) विचाररहित शिक्षणाचे दोष पाठनियोजनामुळे दूर होतात.

५) पाठाची उद्दिष्टे ठरविण्यासाठी पाठनियोजन गरजेचे आहे.

६) पाठ नियोजनामुळे शिक्षकाची मानसिक तयारी होते.

७) पाठ नियोजनामुळे अध्यापनात समाविष्ट करावयाच्या अधिक उच्च ज्ञानाचा विचार होतो.

८) पाठनियोजनामुळे पाठ्यांशातील आशय घटकांचे विश्लेषण कळते.

९) पाठनियोजनामुळे शिक्षककृती, आधार सामुग्री, मूल्यमापन साधने निश्चित करता येतात.

### ३.२.३ पाठनियोजनाचे महत्त्व

पाठनियोजन केल्याने खालील गोष्टी साध्य होतात.

१) आशय, उद्दिष्टे, बहुविध कृती व साहित्य याद्वारे निर्मित अध्ययन अनुभूती आणि मूल्यमापन साधने यांची योग्य सांगड घालता येते.

२) उपलब्ध वेळेचा दिलेल्या अध्यापनासाठी सुयोग्य वापर करता येतो.

३) कोठे व केव्हा अध्ययन अध्यापन कृतीचे रेखाटन करता येते.

४) नियोजित अध्यापनाची पूर्वज्ञानाशी व पुढील अध्ययनाशी सांगड घालता येते.


५) अध्यापनाची उद्दिष्टे, शैक्षणिक साधने, मूल्यमापन साधने, उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उपागम / मार्ग, आशय संघटनाच्या पद्धती, अध्यापनाची प्रतिमाने व कौशल्ये यांचा परस्पर संबंध, उपलब्ध, तसेच पर्यायाची जाणीवपूर्वक निवड करता येते.

## ३.२.४ दैनंदिन पाठाची उद्दिष्टे

दैनंदिन पाठ नियोजन करताना प्रथम उद्दिष्टे निश्चित करावी लागतात. त्याचबरोबर त्यांची स्पष्टीकरणे लिहणे आवश्यक असते.

प्रत्यक्षात शिकवायच्या घटकाच्या अध्यापनातून जे विशिष्ट हेतू साधावयाचे असतात त्यांना उद्दिष्टे असे म्हणतात.

या उद्दिष्टांचे अ) बोधात्मक आ) भावात्मक क) क्रियात्मक असे तीन प्रकार पडतात.




आकृती क्र.३.१ उद्दिष्टांचे प्रकार

भाषा अध्यापनामध्ये बोधात्मक व भावात्मक क्षेत्रातील उद्दिष्टांवर जास्त भर दिला जातो. दैनंदिन पाठात खालील उद्दिष्टांना महत्त्व दिले जाते.

१) ज्ञान

हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे या उद्दिष्टामध्ये स्मरणावर भर आहे. मराठी अध्यापनामध्ये एखादा धडा वाचल्यानंतर त्याच्या लेखकाचे नाव, लेखकाने लिहलेल्या साहित्यकृतींची नावे, त्यातील नवीन शब्दांचा अर्थ सांगणे, त्यातील पात्रांची नावे सांगणे, म्हणी सांगणे, वाक्प्रचार सांगणे इत्यादी घटक विद्यार्थ्यांनी साध्य केले तर विद्यार्थी ज्ञानपातळीपर्यंत पोहचला असे समजले जाते. याचबरोबर शब्दांच्या अर्थातील फरक समजावून देणे, पाठ शुद्ध वाचन करणे, आरोह-अवरोहपूर्ण वाचन करणे, पाठाचे संरचनेतील स्थान सांगणे, वाक्यरचना, विरामचिन्हे हे सर्व ज्ञान या उद्दिष्टात येते.

२) आकलन

आकलनात तीन स्तर आहेत भाषांतर, विवेचन व पूर्वकथन, धड्यांचा सारांश, मध्यवर्ती कल्पना, उताऱ्यांचे भाषांतर, प्रश्नांची उत्तरे हे सर्व विद्यार्थ्याची आकलन क्षमता दाखवितात. पाठयांशातील, विचार, कल्पना, भावना समजून घेणे, त्याचा योग्य उपयोग करणे हे आकलनात येते.

३) उपयोजन

मिळालेल्या ज्ञानाचा वापर विद्यार्थी अपरिचित घटनेमध्ये करतो तेव्हा त्याला उपयोजन असे म्हणतात. भाषेतील नवीन शब्द, वाक्प्रचार, अलंकार, म्हणी यांचे आकलन झाल्यानंतर विद्यार्थी जेव्हा निबंधात लिहतात तेव्हा त्यांचा वापर स्वतःच्या भाषेत करतात, ते त्यांचे उपयोजन होय.

४) अभिरुची

विद्यार्थ्याला एखादया विषयामध्ये अभिरुची निर्माण होत नाही तोपर्यंत तो विषय नीट अभिरुची घेऊन अध्ययन करु शकत नाही. म्हणून दैनंदिन पाठांमधून विद्यार्थ्यांमध्ये अभिरुची निर्माण करणे महत्त्वाचे असते. घटकाच्या संदर्भात अभिरुचीची निवड करावी

लागते. त्याचा उल्लेख पाठ नियोजनात करावा लागतो. मात्र या उद्दिष्टाचे मापन करता येत नाही.

मराठीमध्ये पुस्तके वाचणे , इतर वाङम्य वाचणे, मासिके, वर्तमानपत्र वाचणे, बातम्या ऐकणे, रेडिओ, दूरदर्शनचे चांगले कार्यक्रम पाहणे इत्यादी.

५) अभिवृत्ती

अभिरुचीनंतर अभिवृत्ती निर्माण होते. अभिवृत्ती ही कायम टिकणारी असते म्हणून विद्यार्थात चांगली अभिवृत्ती निर्माण करणे गरजेचे असते.

अभिवृत्ती हे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे. ते पाठात मोजता येत नाही. भाषा पाठनियोजनात ते लिहणे गरजेचे असते.

आपल्या राष्ट्राप्रती अभिमान, आदर, धर्म, संस्कृती, इतिहास व परंपरा याबद्दल अभिमान, आदर निर्माण करणे इत्यादी अभिवृत्तीत येते.

उद्दिष्टांच्या निश्चितीनंतर त्यांची स्पष्टीकरणे लिहणे आवश्यक असते.

## ३.२.५ दैनंदिन पाठ नियोजन

वार्षिक नियोजन व घटक नियोजनाप्रमाणे पाठ नियोजनाचेही महत्त्व आहे. कोणत्याही पाठाचे वर्गात अध्यापन करण्यापूर्वी नियोजन करणे म्हणजेचे पूर्वतयारी करणे आवश्यक असते. एखादा पाठ शिकविण्यापुर्वी सूक्ष्मपणे अभ्यासणे जरुरीचे असते. नियोजन हे प्रशिक्षणार्थींना आवश्यक असते. प्रशिक्षणार्थी ३५ मिनिटांच्या तासिकेत शिकवायच्या पाठ्यांशाचा विचार करतात.

### पाठ नियोजनाचा प्रारंभिक भाग

प्रत्यक्ष अध्यापनाच्या दृष्टीने पाठ्यांशाचे नियोजन करण्यापूर्वी काही बाबी लक्षात घेणे गरजेचे असते. कारण पुढील विवेचनासाठी व नियोजनासाठी या बाबींची मदत होत असते त्या पुढीलप्रमाणे

१) पाठ्यांशाची निश्चिती

कोणत्याही विषयाचा एका विशिष्ट तासिकेत अध्यापन करण्याजोगा पाठ्यांश निश्चित केल्यावर त्याची नोंद मुख्य घटक, उपघटक व पाठ्यघटक अशा वर्गवारीत करावी लागते. प्रत्येक विषयाची त्याच्या आशयाच्या स्वरुपावरुन काही अंगे, उपांगे पडलेली असतात. त्यावरुन पाठ्यांशाचे मुख्य घटक, उपघटक व पाठ्यघटक ठरविता येतात

अ) मुख्य घटक

प्रत्येक विषयाच्या स्वरुपावरुन वेगवेगळी अंगे असतात. त्याचा समावेश मुख्य घटकात होतो.

उदा - भाषेमध्ये गद्य, पद्य, व्याकरण, लेखन अशी अंगे आहेत.

पाठ्यांश कशा प्रकारचा आहे हे पाहून त्याचा मुख्य घटक लिहणे गरजेचे असते.

ब) उपघटक

मुख्या घटक निश्चित झाल्यानंतर प्रत्येक विषयाच्या अंगाची काही उपांगे असतात. त्यांचा उपघटकांमध्ये समावेश होतो.

उदा- भाषेमध्ये मुख्य घटक गद्य असेल व शिकविण्याचा धडा हा ललितलेखामध्ये येत असेल तर त्याचा उपघटक ललितलेख असा होईल.

क) पाठ्यघटक

यालाच पाठ्यवस्तू/पाठ्यांश देखील म्हणतात. त्या विशिष्ट तासिकेत उपघटकातील जो विशिष्ट भाग शिकवायचा त्याचा पाठ्यघटक वा पाठ्यांशात समावेश होतो.

| | | | |
|---|---|---|---|
| उदा- मराटीत | मुख्यघटक | - | व्याकरण |
| | उपघटक | - | अलंकार |
| | पाठयघटक | - | शब्दालंकार |

### २) आवश्यक पूर्वज्ञान

कोणत्याही पाठ्यांशाचे अध्यापन करण्यासाठी त्यांना जे अध्ययन अनुभव द्यावे लागतात, प्रश्न विचारावे लागतात, त्यासाठी विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानाची माहिती असणे गरजेचे असते. हे पूर्वज्ञान म्हणजे विदयार्थी ज्या वर्गात शिकतो आहे त्यामागील वर्गामध्ये अध्ययन केलेल्या अभ्यासक्रमाचा त्याचा पूर्वानुभव असतो. त्याचप्रमाणे त्याला असलेले सामान्य ज्ञानही पूर्वानुभवामध्ये गृहीत धरले जाते. या आवश्यक पूर्वज्ञानाला अनुसरुन अध्ययन-अध्यापन प्रक्रिया विकसित करता येते.

### ३) विशेष शैक्षणिक साहित्य

अध्यापनासाठी लागणारे फलक खडू, दर्शिका सोडून जे काही इतर साहित्य वापरले जाईल त्याची नोंद यात केली जाते. फलक हे मूलभूत साधन असल्याने ते दरवेळी नोंद करण्याची गरज नसते.

### ४) उद्दिष्टे व त्यांची स्पष्टीकरणे

येथे पाठ्यघटकाला अनुसरुन सर्वसामान्य उद्दिष्टे व त्याला अनुसरुन अपेक्षित वर्तनबदल नोंद करावेत.

## ३.२.६ पाठाच्या पायऱ्या

व्यक्तिमत्त्व विकासाच्या क्षेत्रानुसार व वयोमानानुसार, स्तरानुसार अनुसरुन पाठाच्या वेगवेगळया प्रकारांचा वापर जरी केला जात असला व पाठ्यक्रमानुसार पाठाच्या पायऱ्या जरी थोड्याफार बदलत असल्या तरीही सर्व प्रकारच्या अध्यापन पद्धतींना लागू पडणाऱ्या मानसशास्त्रीय तत्त्वांवर आधारित असल्याने त्यांचे महत्त्व कोणत्याही पद्धतीत मुळीच कमी होत नाही.

## हर्बार्टची पंचपदी

हर्बार्टची पंचपदी म्हणजे अध्यापन पद्धतीला काही नियमबद्ध शिस्त लावण्याचा पद्धतशीर प्रयत्न होय. अध्ययनकर्त्याचे अवधान अनेक प्रकारे आकर्षून घेऊन अध्ययन कर्त्याची जिज्ञासा कशी जागृत करता येईल यावर हर्बार्टने लक्ष केंद्रित केले व आपली चतुष्पदी सांगितली. त्याची ही चतुष्पदी त्याच्या आसंवेदन (Apperception ) सिद्धांतावर आधारलेली आहे.

प्रबोध वा आसंवेदन म्हणजे पूर्वानुभवाची जागृती करुन त्याची नव्या अनुभवाशी सांगड घालण्याची प्रक्रिया होय. व्यक्तीला व्यवहारात जे विविध अनुभव येतात त्या अनुभवाचे पृथक्करण तिच्या मनामध्ये होत असते. त्यांची परस्परांशी तुलना करुन त्यातुन सामान्य गुणधर्माच्या आधारे ती आपला सामान्यबोध तयार करत असते व त्यातूनच काही सामान्य निष्कर्ष काढले जातात. हेच सिद्धांत किंवा तत्त्वे होत. यालाच ज्ञान मिळविणे असे म्हणता येईल. याच ज्ञानप्रक्रियेवर हर्बार्टची चतुष्पदी (4 steps) आधारलेली होती. हर्बार्टच्या मूळ चतुष्पदीमध्ये 1) Clearness 2) Association 3) System 4) Method अशा चारच पायऱ्या येतात. नंतर त्यांच्या झिलर आदि शिष्यांनी त्यांच्याच अनुमतीने त्यांचे रुपांतर पंचपदीत केले. आज त्याच पायऱ्या हर्बार्टची पंचपदी Harbartian Formal Steps म्हणून ओळखल्या जातात त्या अशा

१) पूर्वतयारी (Introducation /Preparation )

२) विषय प्रतिपादन (Presentation )

३) तुलना व साहचर्य प्रस्थापन (Comparison & Association )

४) सामान्यीकरण किंवा संकलन (Generalization or Recapitulation )

५) उपयोजन (Application)

### ३.२.६.१ प्रचलित पाठाच्या पायऱ्या

हर्बार्टने आपल्या पंचपदीत पाच पायऱ्यांचा समावेश केला होता. मात्र आज बहुसंख्य विद्यापीठे व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमधून ज्या पायऱ्या आढळून येतात त्या सहा किंवा सात पायऱ्या असतात. पाठाच्या पायऱ्यांचे महत्त्व कायम ठेवून काही पायऱ्या वाढलेल्या दिसतात. त्या पुढीलप्रमाणे

| हर्बार्टप्रणित पायऱ्या | प्रचलित पायऱ्या |
|---|---|
| १) पूर्वतयारी | १) प्रस्तावना |
| २) विषय प्रतिपादन | २) हेतुकथन |
| ३) तुलना-साहचर्य प्रस्थापन | ३) विषय प्रतिपादन |
| ४) सामान्यीकरण/संकलन | ४) संकलन |
| ५) उपयोजन | ५) उपयोजन |
| | ६) मूल्यमापन |
| | ७) स्वाध्याय |

हर्बार्टच्या पंचपदीचे मानसशास्त्रीय महत्त्व कायम ठेवून त्यात उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने थोडासा बदल करुन त्याचे सप्तपदीत रुपांतर केल्यास जास्तीत जास्त उद्दिष्टे सहज गतीने व नेमकेपणाने साध्य होऊ शकतील

केवळ पंचपदी (पाच पायऱ्या ) ठेवायचे म्हटले तर दोन तीन बाबी दुसऱ्या पायरीमध्ये अंतर्भूत कराव्या लागतील उदा- हर्बार्टच्या पूर्वतयारी या पायरीचे आज प्रस्तावना व प्रस्तावनेचा शेवट म्हणून हेतुकथन केले जाते. पण हेतुकथन ही वेगळीच पायरी धरल्यास तिचा हेतू पूर्णपणे साध्य होईल. तसेच हर्बार्टच्या विषय विवेचन व साहचर्य तुलना प्रस्थापन या दोन पायऱ्यांचे एकत्रीकरण करुन विषय प्रतिपादन ही पायरी ठरलेली आहे. पायरीत

करावयाच्या बाबी त्याच आहेत. फक्त दोन वेगळ्या पायऱ्या न घेता विषय प्रतिपादनातच विषय विकास व साहचर्य-तुलना संबंध प्रस्थापित केला जाईल.

सामान्यीकरण / संकलन ही पायरी तशीच आहे. त्याचे स्वरुप थोडे बदलले आहे. काही ठिकाणी संकलनालाच मूल्यमापन मानले जाते. मात्र मूल्यमापन ही वेगळी पायरी ठेवून उद्दिष्टपूर्ती पडताळता येते. त्याचे विवेचन पायरीच्या संदर्भात वेगळे केलेलेच आहे. संकलन, उपयोजन, मूल्यमापन या सर्व पायऱ्या वेगवेगळया केल्याने त्यातून अनेकविध हेतू साध्य करता येतात व उद्दिष्टपूर्तीची पडताळणीही स्वतंत्रपणे व अधिक व्यापकपणे करता येणे शक्य होते. सातवी व शेवटची पायरी म्हणजे गृहपाठ /स्वाध्याय ही पायरी उपयोजनाचाच एक भाग समजली जाते. (पंचपदीत) मात्र तिचे स्वतंत्र अस्तित्व ठेवल्यास गृहपाठ ठेवण्यामागील हेतू पूर्णपणे साध्य होऊ शकतो. म्हणून सात पायऱ्याचा हेतूपूर्वक वापर करणे गरजेचे ठरते. आज क्षमताधिष्ठित अध्यापनाचे धोरण राबविले जात असल्याने जास्तीत जास्त क्षमता या पायऱ्यांच्या आधारे विदयार्थ्यात येवू शकतात.

कोणत्याही पद्धतीने केल्या जाणाऱ्या अध्यापनासाठी सर्वसाधारणपणे उपयोगी पडणाऱ्या सात पायऱ्यांचा वापर केव्हा व कसा करायचा तसेच त्याचे मानसशास्त्रीय व तर्कशास्त्रीय महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १) प्रस्तावना

प्रत्येक अध्यापनासाठी प्रस्तावना ही आवश्यक पायरी आहे. शालेय वेळापत्रकामध्ये एकामागे एक वेगवेगळ्या विषयांचे तास असतात व विद्यार्थ्याचे मन त्याने आधीच्या विषयामध्ये मिळविलेल्या अनुभूतीमध्ये रेंगाळत असते. त्याच्या मनावरील आधीच्या विषयाचा प्रभाव कमी करुन त्याला नवीन वातावरणात आणण्यासाठी प्रस्तावना आवश्यक ठरते. प्रस्तावनेचा उद्देश नवीन ज्ञान ग्रहण करण्यासाठी विद्यार्थ्याच्या मनाची पूर्वतयारी

व्हावी हा असतो. प्रस्तावनेमुळे विद्यार्थ्यांच्या मनात पूर्वज्ञान जागृत करता येते. प्रस्तावना चांगली केल्यास पाठ परिणामकारक होण्याची शक्यता वाढते.

प्रस्तावनेसाठी अध्यापक आपल्या कल्पकतेने वेगवेगळ्या पद्धती वापरु शकतो.

जसे,-

चित्राच्या आधारे, कथनाच्या आधारे, प्रश्न विचारुन, गाण्यांच्या आधारे, कथा सांगून, तिचे सार विचारुन प्रस्तावना करता येते. प्रस्तावना ही रंजक असावी तरच विद्यार्थ्यांचे लक्ष आकर्षून त्यांच्या मनात पाठ्यांशाविषयी जिज्ञासा जागृत होईल. प्रस्तावना पाच मिनिटांची असावी. त्यानंतर हेतुकथन करावे.

## २) हेतुकथन

ही पाठाची दुसरी पायरी आहे. पायरी म्हणून हेतुकथनाला स्वतंत्र असे महत्त्व आहे. हेतुकथनात अध्यापक विद्यार्थ्यांना ते आजच्या तासिकेत काय शिकणार आहेत ते स्पष्टपणे व अचूक शब्दांत सांगतो. पाठाचा हेतू कळल्यामुळे विद्यार्थी अध्ययनास तयार होतात. आकर्षक प्रस्तावनेमुळे कधी कधी निर्माण झालेली संदिग्धता हेतुकथनामुळे नष्ट होते. पाठ्यांशाच्या अध्यापनाचा हेतू स्पष्ट करणारे सर्व समावेशक व्यापक व निस्संदिग्ध असे विधान म्हणजे हेतुकथन असते. विधान संपताच शीर्षक फलकावर लिहावे.

## ३) विषय प्रतिपादन

पाठाची तिसरी पायरी म्हणजे विषय विवेचन होय. ही प्रत्यक्ष ज्ञान देण्याची पायरी होय. म्हणून या पायरीचे महत्त्व सर्वात जास्त आहे. त्याचप्रमाणे याच पायरीत अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रत्यक्ष सुरु असल्याने ही अधिक व्यापक व संकीर्ण स्वरुपाची आहे. अध्यापन पद्धती, शैक्षणिक साधने, दिल्या जाणाऱ्या अनुभूतींचा विचार, शिक्षक कृती कोणती, विद्यार्थी कृती कोणती याचा समग्र विचार या पायरीत केला जातो.

विषय व पाठ्यांशाला अनुसरुन कोणती अध्यापन पद्धती वापरावी याचा विचार याच पायरीत करता येतो. बाकीच्या पायऱ्यांचे स्वत:चे असे स्वतंत्र महत्त्व असल्याने त्या कायम ठेवून अध्यापनात वेगवेगळ्या अध्यापन पद्धती वापरणे या पायरीत शक्य होते. प्रत्येक वेळी विशिष्ट अध्यापन पद्धतीने अध्यापन केल्यानंतर संकलन, उपयोजन, मूल्यमापन, स्वाध्याय या पायऱ्या नेहमीप्रमाणे वापरता येतात कारण कोणत्याही अध्यापन पद्धतीत त्यांचा विचार थोड्या फार प्रमाणात केलेलाच असतो.

विषय प्रतिपादनात पाठ्यांशातील मुख्य मुद्दे क्रमाने घेऊन त्यानुसार स्पष्टीकरणासाठी योग्य शैक्षणिक अनुभूती योजल्या जातात. विविध साधनांचा विचार आधार प्रणालीत होतो. प्रश्न, कथन, स्पष्टीकरण, प्रयोग या सर्व बाबींचा शिक्षक कृतीत विचार केला जातो. त्याप्रमाणे त्याला अनुसरुन विद्यार्थी कृती काय राहील याचा विचार केला जातो. एकंदरीत अध्ययन अध्यापन प्रक्रियेचा सविस्तर विचार यात केला जातो.

**भाषाविषयामध्ये विषय प्रतिपादन**

भाषा विषयामध्ये गद्य पद्य अध्यापनामध्ये खालील उपपायऱ्यांचा समावेश होतो.

**अ) लेखक परिचय**

भाषेमध्ये ज्या लेखक वा कवीचा पाठ / कविता असेल त्याचा थोडक्यात परिचय (पार्श्वभूमी) हेतुकथनानंतर करुन द्यावा लागतो. त्यात लेखकाचे पूर्व नाव, जन्म, मृत्यू केव्हा झाला. त्याने निर्माण केलेले साहित्य, त्यांची वैशिष्ट्ये व प्रस्तुत पाठ वा कविता कोणत्या साहित्यातून घेतली आहे. लेखकाची पार्श्वभूमी जाणून घेतल्यामुळे "त्याची" रचना वाचकांना समजून घेण्यास मदत होते.

**ब) प्रकट वाचन**

भाषेमध्ये भाषिक उद्दिष्टे साध्य करणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी भाषेमध्ये जो पाठ्यांश शिकवायचा असतो त्या पाठ्यांशाचे आधी प्रगट वाचन करावे लागते. यातून विद्यार्थ्यात श्रवणाद्वारे आकलनाची पात्रता निर्माण होते व त्यांना शब्दांचे अचूक उच्चारण

समजते. त्यासाठी अध्यापकाने स्वत: स्पष्ट व खणखणीत आवाजात मोठ्याने पाठ्यांश वाचला पाहिजे.

वाचन आरोह- अवरोहयुक्त असावे. भाषिक चिन्हांप्रमाणे योग्य तिथे थांबावे, स्वल्पविराम, पूर्णविराम लक्षात घेणे, आवाज आशयानुसार बदलणे, भावपूर्ण वाचन करणे इत्यादी सर्व बाबी वाचताना लक्षात घ्याव्यात. अध्यापकाचे प्रकट वाचन जितके निर्दोष व योग्य असेल तितके विद्यार्थ्यांना जास्त चांगले आकलन होऊ शकेल. प्रगट वाचनाद्वारे श्रवण, भाषण व वाचन ही भाषिक उद्दिष्टे साध्य होऊ शकतात.

### क) मूक वाचन

प्रकट वाचनानंतर विद्यार्थ्यांना पाठ्य घटक स्वत: मनात वाचन करायला सांगावा. वाचनाद्वारे आकलनाची पात्रता वाढविणे हे या पायरीचे उद्दिष्ट असते. काही विद्यार्थ्यांना अगदी मोठेपणी देखील मोठ्याने वाचल्याशिवाय आकलन होत नाही. ही अयोग्य सवय होय. स्वत: वाचून त्याचे आकलन झाले पाहिजे. तसेच मनातल्या मनात वाचता आले पाहिजे. लिपी सहज आणि गतीने वाचण्याची क्षमता वाढविणे हेही यामागील उद्दिष्ट असते. मूकवाचनामुळे विद्यार्थी प्रत्येक शब्द स्वत: मनात वाचून त्याचा आशय समजून घेण्याचा प्रयत्न करीत असतो.

मूकवाचन चालू असताना मूकवाचनाला दिशा मिळावी म्हणून हेतुप्रश्नाचा वापर केला जातो. हेतुप्रश्न हा सोपा असावा.

### ड) स्थूल चर्चा

पाठ्य घटकासंबंधी ढोबळमानाने केली जाणारी ही स्थूल चर्चा असते. चर्चा म्हणजे विद्यार्थ्यांनी आपली मते मांडणे असा शब्दश: अर्थ यात अभिप्रेत नसतो. मूकवाचनानंतर विद्यार्थ्यांनी हेतुप्रश्नाच्या आधारे सांगितलेली मध्यवर्ती कल्पना, महत्त्वाचा आशय, घटना, प्रसंग थोडक्यात सांगायचा आहे. चार ते पाच वाक्यांमध्ये ही मध्यवर्ती कल्पना, पाठ्य घटकातील विशेष स्पष्ट व्हावेत.

### इ) सूक्ष्म चर्चा

ही पायरी भाषेच्या विवेचनातील अत्यंत महत्त्वाची पायरी असते. सूक्ष्म चर्चा ही नावाप्रमाणेच सूक्ष्मपणे केली जाणारी चर्चा असते. यात पाठ्यघटकांचा आशय, ध्वन्यर्थ, गर्भित अर्थ, नवीन शब्द, वाक्प्रचार, म्हणी व व्याकरण या सर्वांच्या सविस्तर विश्लेषणाचा यात समावेश होतो. सूक्ष्म चर्चा करत असताना प्रश्न, निवेदन यांची सांगड घालावी लागते. भाषेमध्ये विद्यार्थी व शिक्षक दोघांसमोर पुस्तक असते. त्याच्या आधारेच विषय विकसित केला जातो. जी बाब अधिक नीटपणे खोलात जाऊन समजावून द्यायची असते. तेथेच अध्यापकांनी निवेदन करणे गरजेचे असते. एखादी कल्पना स्पष्ट करण्यासाठी जास्तीची अनेक उदाहरणे देऊन ती स्पष्ट करावी लागते. विषय प्रतिपादन या पायरीत प्रश्न व कथनाची योग्य सांगड घालावी लागते.

### ई) नवीन शब्द

सूक्ष्म चर्चेत विवेचन करत असतानाच विवेचनात ओघाने येणाऱ्या नवीन शब्दांच्या अर्थाचे स्पष्टीकरणही अपेक्षित असते. ते फलकावर लिहणेही गरजेचे असते. त्याचे अर्थ लिहू नयेत. फक्त पाठ्यांशानुसार अर्थाचे विवेचन करावे.

आजच्या पाठयोजनेतील विषय प्रतिपादन ही पायरी हर्बार्टच्या विषयप्रतिपादन आणि तुलना साहचर्य प्रस्थापन या दोन पायऱ्यांचे एकत्रीकरण होय.

विषय प्रतिपादनात नवे ज्ञान देण्याची क्रिया घडत असल्याने अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील हा महत्त्वाचा टप्पा असतो. यात अध्यापकाला नवे ज्ञान विद्यार्थ्यांनी परिपूर्ण व पुरेशा अनुभूती द्याव्या लागतात. त्यासाठी शैक्षणिक साधनांचा वापर, फलक लेखन, प्रश्न, निवेदन, उदाहरण देणे, प्रयोग नकाशा वाचन इत्यादी सर्व कमीअधिक प्रमाणात एकत्रितपणे कराव्या लागतात. तसेच विदयार्थ्यांनाही सहभागी करुन घ्यावे लागते.

४) संकलन

संकलन म्हणजे पाठाचे पुनरवलोकन, सिंहावलोकन, पाठ्यघटकाचा सारांश किंवा थोडक्यात घोषवारा होय. यातून प्राप्त ज्ञान दृढ होण्यास मदत होते. कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशयाची मांडणी करणे व लक्षात ठेवायला सोप्या पद्धतीने लेखन करण्याचे कौशल्य संकलन या पायरीत वापरता येते.

भाषा विषयात धडा, कवितेची मध्यवर्ती कल्पना सारांश लेखनामध्ये लिहता येतात.

५) उपयोजन (Application )

उपयोजन म्हणजे प्राप्त ज्ञानाचा नवीन अपरिचित परिस्थितीत वापर किंवा प्राप्त ज्ञानाचा उपयोग ही पाठाची पाचवी पायरी होय. उपयोजन हे नेहमी संकलनानंतर केले जाते.

कोणत्याही पाठ्यघटकाच्या संदर्भात ज्ञान, आकलन या उद्दिष्टांच्या व्यतिरिक्त कौशल्य, उपयोजन, मनोवृत्ती, अभिव्यक्ती इत्यादी अनेक उद्दिष्टे असतात. त्यांची पूर्तता या पायरीत करुन घेता येते.

६) मूल्यमापन (Evaluation )

पाठ योजनेत मूल्यमापनाला महत्त्वाचे स्थान आहे. कारण अध्यापकाने केलेले अध्यापन विद्यार्थ्यांपर्यंत किती पोहचले हे मूल्यमापनाची वेगवेगळी साधने वापरुन शोधता येते. उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली, कोणकोणत्या अध्ययन निष्पत्ती आल्या हे पाहता येते. मूल्यमापनामुळे अध्यापकाला आपल्या अनुभूतींचा, पद्धतीचा पुनर्विचारही करता येतो. म्हणून मूल्यमापन आवश्यक आहे.

७) स्वाध्याय (Assignment)

मूल्यमापनानंतर अध्यापन प्रक्रिया एका तासिकेच्या पाठ्यघटकाच्या संदर्भात पूर्ण होते. त्यानंतरची शेवटची पायरी म्हणजे स्वाध्याय किंवा गृहपाठ होय. हे दोन्ही शब्द जरी

एकाच पायरीसाठी वापरले गेले तरी दोन्हीच्या अर्थात थोडा फरक आहे. स्वाध्याय म्हणजे स्वत: अभ्यास करणे होय व गृहपाठ म्हणजे घरी करायचा अभ्यास होय.


पाठ्यांश शिकवून झाल्यानंतर तो कायमचा विद्यार्थ्यांच्या मनावर ठसण्यासाठी स्वाध्याय उपयुक्त ठरतो. स्वाध्यायामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला, क्रियाशीलतेला वाव मिळावा, त्यांची अभिरुची जोपासली जावी असा स्वाध्याय हवा. स्वाध्यायात विविधता हवी.

## ३.३ आशयघटक

प्रभावी अध्यापनासाठी आशयावर प्रभुत्व असणे आवश्यक असते. पण एवढीच गोष्ट पुरेशी नाही. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाला आशयाच्या विविध पैलूंची माहिती असणे गरजेचे आहे.

### ३.३.१ आशयाचा अर्थ

आशय हा संस्कृत शब्द आहे. त्याचे अर्थ खालीलप्रमाणे सांगता येतील.




आकृती क्र.३.२ आशयाचे अर्थ

आशयाला इंग्रजीत Content असे म्हणतात.

"Content means the ideas or meanings prescribed or to be presented in speech or writing"

### ३.३.२ आशयाच्या व्याख्या

१) आशय म्हणजे विद्यार्थ्यांना शिकवायचा मजकूर किंवा अध्यापनाची विषयवस्तू होय.[४]

२) आशय म्हणजे पाठ्यपुस्तकात छापलेला मजकूर होय.[५]

३) आशय म्हणजे अर्थपूर्ण मजकूर होय.[६]

४) आशय म्हणजे एखादा विशिष्ट हेतू मनात धरुन संकलित केलेली माहिती होय.[७]

### ३.३.३ आशयाची गरज

१) शैक्षणिक उद्दिष्टे विषयानुरुप व आशयानुरुप वेगवेगळी असतात. प्रत्येक विषयाची किंवा विषयांतर्गत आशयाची विशिष्ट उद्दिष्टे असतात. त्यामुळे अध्यापकाला आपण शिकविणार असलेल्या आशयातून कोणती उद्दिष्टे साध्य करायची याचा विचार करावा लागतो. त्यासाठी आशयाची गरज आहे.

२) आशय कोणत्या क्रमाने शिकवायचा? कसा शिकवायचा? किती खोलवर शिकवायचा? की ज्यामुळे विद्यार्थ्याला उद्दिष्टाप्रत घेवून जाता येईल. याचा विचार करण्यासाठी आशयाची गरज आहे.

३) आशय फक्त शिकविता येत नाही. त्या आशयाचे अध्यापनशास्त्रीय आशयात रुपांतर करण्यासाठी आशयाची गरज असते.

**आशयाचे घटक - स्वरुप**

तपशील
↓
वस्तुस्थितीदर्शक विधाने
↓
संज्ञा
↓
संबोध
↓
तत्त्वे
↓
नियम
↓
सुत्रे
↓
व्याख्या
↓
घटना
↓
व्यक्ती
↓
प्रसंग
↓
सामान्यन्यीकरण
↓
सिध्दांत

३.३ आशयाचे स्वरुप

विषयाच्या स्वरुपानुसार या मांडणीचे स्वरुप वेगळे सुद्धा असू शकते.

## ३.३.४ आशयाचे प्रकार

शुल्मनने आशयाचे तीन प्रकारात वर्गीकरण केलेले आहे.

१) विषयज्ञान (Content Knowledge)

२) अभ्यासक्रमीय ज्ञान (Syllabus Knowledge)

३) अध्यापनशास्त्रीय ज्ञान (Pedagogical Knowledge)

## विषयज्ञान

अध्यापन करावयाच्या एखाद्या विषयाचे सखोल ज्ञान, संपूर्ण ज्ञान म्हणजे विषयज्ञान आशय होय.

अध्यापकाने पदवी, पदव्युत्तर अध्यापनातून मिळविलेले ज्ञान होय.

## अभ्यासक्रमीय ज्ञान

एखाद्या विषयाचे सखोल ज्ञान वेगळे व त्या विषयाच्या इयत्तेसाठी, कोर्ससाठी जो भाग आहे त्या भागाचे सखोल ज्ञान वेगळे म्हणजे अभ्यासक्रम होय.


ज्ञान म्हणजे एखाद्या विषयाचा एखाद्या इयत्तेसाठी किंवा कोर्ससाठी नेमण्यात आलेला कार्यक्रम जो भाग आहे त्याचे सखोल ज्ञान असणे.

## अध्यापनशास्त्रीय ज्ञान

अध्यापन करावयाच्या एखाद्या विषयातून कोणता भाग सोपा आहे. कोणता भाग अवघड आहे हे समजून घेऊन त्यानुसार अध्यापनाची योजना करणे त्यानुसार पद्धती ठरविणे ही प्रक्रिया यात येते.

उदा- मराठीतील व्याकरणासाठी उदगामी-अवगामी पद्धतीचा वापर करणे.

आशय घटक दर्शक तक्ता




आकृत्ती ३.४ आशय घटक दर्शक तक्ता

इयत्ता आठवी च्या पुस्तकातील घटक निश्चिती केलेले आहे. त्यानुसार कल्पना, भावना, विचार हे आशय घटक संशोधनात अभ्यासलेले आहेत. या संबंधी तज्ञांचे मत जाणून घेतलेले आहे. त्यानुसार भावना ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. यासाठी भावनेच्या वेगवेगळ्या छटा प्रशिक्षणार्थींनी जाणून घेतल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे कल्पना स्पष्ट करताना विद्यार्थ्यांच्या कल्पनेला वाव दिला पाहिजे. त्याचप्रमाणे विचारप्रवर्तक प्रश्न अथवा कृती ही विद्यार्थ्यांना दिल्या जाव्यात.

## आशयाचे घटक

### बोधात्मक क्षेत्रातील विषय

गणित, शास्त्र,भूगोल,अर्थशास्त्र

१.संज्ञा
२. संकल्पना
३. तथ्ये
४. माहिती
५. रचना
६. संरचना
७. प्रक्रिया
८. पद्धती
९. सूत्रे
१०. नियम
११. आकृती
१२. कौशल्ये
१३. सिद्धांत
१४. व्याख्या
१५. गुणधर्म
१६.कार्यकारण भाव

### भावात्मक क्षेत्रातील विषय

मराठी , इंग्रजी

१. शब्द
२. वाक्ये
३. म्हणी
४. वाक्प्रचार
५. व्याख्या
६. नियम
७. कौशल्ये
८.स्थिरभाव
९. संस्कार
१०. वृत्ती
११. संदेश
१२. वाङ्मय प्रकार
१३. माहिती

इतिहास

१. माहिती
२.घटना
३. पद्धती
४. वृत्ती
५. कार्यकारणभाव
६. संबंधन
७. संरचना
८. प्रक्रिया
९. मध्यवर्ती कल्पना
१०. संदेश

### क्रियात्मक क्षेत्रातील विषय

कार्यानुभव, प्रात्यक्षिके शारीरिक शिक्षण इ.

१.माहिती
२.कार्यकारणभाव
३.पद्धती
४. प्रक्रिया
५. कौशल्ये
६. प्रात्यक्षिक तात्त्विक भाग
७. हत्याराची ओळख
८. हत्याराचा वापर
९. कृती दिग्दर्शन
१०. सराव
११.उत्पादितांचे निकष

आकृती क्र.३.५ विविध विषयातील आशय घटक

## ३.४ आशयघटकाची माहिती

प्रस्तुत संशोधनासाठी ज्या आशय घटकांसाठी पाठनियोजन केलेले आहे त्यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

१) कल्पना
२) भावना
३) विचार

### ३.४.१ कल्पना - (Idea)


मानसशास्त्रात कल्पनांच्या बाबत परस्पर विरोधी अनेक सिद्धांत आणि उपपत्ती मांडल्या गेलेल्या आहेत असे असले तरी त्यातील एका मुद्याबाबत सर्वांचेच एकमत आहे. तो मुद्दा म्हणजे व्यक्तीच्या मानसिक विकासात वेदन व संवेदन यांच्या नंतरच कल्पनांचा उद्भव होतो आधी नाही. वेदनामध्ये वस्तूचा कठीणपणा रंग, आकार इत्यादी गुणांची आपणास प्रत्यक्ष जाणीव होते. संवेदनात आपणास हे किंवा वेदन धारण करणाऱ्या अधिष्ठानरुप वस्तूची साकल्याने प्रत्यक्ष जाणिव किंवा ज्ञान होते. उदा-हे टेबल किंवा हे पुस्तक आहे. टेबलाचा व पुस्तकांचा रंग, स्पर्श, आकार इत्यादीधारण करणारे अधिष्ठान संवेदन आणि कल्पना यातील फरक म्हणजे कल्पना ही संवेदनापेक्षा कमी तपशीलवार कमी तीव्र आणि तत्कालीन इंद्रियवेदनांवर कमी प्रमाणात अवलंबून असते. दुसरे म्हणजे संवेदन आपल्या अधीन वापर असतोच काटेकोरपणे बोलायचे झाल्यास आपण टेबल किंवा पुस्तक पाहत नसतो तर आपण त्याचा स्पर्श, रंग, आकार अनुभवीत असतो आणि त्यावरुन आपणास ते टेबल पूर्वानुभवातून मिळते. प्राणी कल्पनांचा वापर करतात. तेव्हा ते कदाचित ह्या अशा पातळीवरील कल्पनांचा वापर करीत असावेत. म्हणजे केवळ वेदनांशी संबंधित अशाच कल्पनांचा वेदनांशी संबंधित नसलेल्या कल्पनांचा वापर करु शकतो. माणूस भूत आणि भविष्य तसेच जे अस्तित्वात नाही त्याचीही कल्पना करु शकतो. ह्या मुक्त कल्पना करण्याच्या सामर्थ्यामुळेच माणूस व प्राणी यांच्यामध्ये भेद आढळतो. मुक्त कल्पना

सामर्थ्यामुळेच माणसास भाषेचे प्रभावी साधन प्राप्त करुन घेता आले. त्यामुळे भूतकाळाची स्मृती आणि भविष्यकाळाची योजना तो करु शकतो. इतिहास, विज्ञान, धर्म, कला इत्यादीची उभारणीही त्याला कल्पनांमुळेच करणे शक्य झाले. थोडक्यात असे म्हणता येईल की, व्यक्तीच्या मनात संवेदना, अवबोध यातून प्रतिमा तयार होते आणि प्रतिमातून कल्पना अवतीर्ण होते.

### ३.४.१.१ कल्पनेची व्याख्या

प्रतिमासृष्टीतील निवडक प्रतिमांची जुळणी करुन एक वेगळेचे मानसिक चित्र तयार करण्याच्या प्रक्रियेला 'कल्पना' असे म्हणतात.[१]

करंदीकर, सुरेश.




आकृती क्र.३.६ कल्पना करण्याचे अर्थ

An idea from a thought, conception or notion, an impression, a conviction or opinion, a plan of action, design, a mental picture, sometimes merely imagined without corresponding reality vage knowledge.

New webster's Dictionary

कल्पना म्हणजे एक अशी संकल्पना मागे घेतलेल्या अनुभवांच्या मदतीने नवे चित्र कल्पनेच्या माध्यमातून तयार केले जाते. यास एक दृकप्रतिमा, मानवी शरीर आणखी दुसरी एक दृकप्रतिमा. माशाचा वास आणखी एक वेगळी गंधप्रतिमा. या तीन प्रतिमांच्या अनुभूतीतून जेव्हा, मत्स्यगंध साकार होते जेव्हा ती कल्पना बनते.

प्रतिमा एखाद्या छायाचित्रासारखी असते. तो एखादया वस्तूचा फोटो असतो. पण कल्पना म्हणजे एखाद्या चित्रकाराने रेखाटलेले अप्रतिम चित्र असते. त्यात केवळ पाहिलेल्या दृश्याची नक्कल असणार नाही तर वेगवेगळ्या प्रतिमांची ती एक विलक्षण रचना असते.


चित्रकार, नाटककार, कवी, कादंबरीकार यांच्या सुंदर रचना म्हणजे दुसरे तिसरे काही नसून पूर्वी सूक्ष्मपणे आणि तरलपणे घेतलेल्या अनुभवांची ती एक जुळणी असते. देव, राक्षस, स्वर्ग, नरक, अप्सरा ही सर्व कल्पनेने रेखाटलेली चित्रे आहेत. या सर्वांचा मूलाधार प्रतिमा आहे. अशा अर्थाने प्रतिमांची जुळणी किंवा प्रतिमांचा खेळ म्हणजे कल्पना होय.

या सर्वावरुन असे म्हणता येते की,

'कल्पना म्हणजे व्यक्तीच्या मानसिक विकासात वेदन, संवेदना, अवबोध व प्रतिमा या क्रमानंतर येणारी मानसिक अवस्था किवा रचना'

### ३.४.१.२ कल्पनांचे प्रकार

कल्पना वेगवेगळ्या प्रकारच्या असतात त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.




आकृती क्र.३.८ कल्पनेचे प्रकार

कल्पनेच्या या विविध प्रकारांचा आपण क्रमाक्रमाने विचार करु कल्पनेचे मुख्य दोन प्रकार आहेत. १) पुनरुत्पादित कल्पना आणि २) रचनात्मक कल्पना

#### १) पुनरुत्पादित कल्पना

मागील अनुभवांच्या प्रतिमांचे यात जसेच्या तसे पुनरुज्जीवन केलेले असल्यामुळे त्याला स्मरण म्हणता येईल. कल्पनासृष्टीत स्मरण ही अतिशय महत्त्वाची मानसिक प्रक्रिया अंतर्भूत असते. आपल्या आयुष्यात घडलेल्या पूर्वीच्या घटना प्रतिमेच्या स्वरुपात मन:पटलांवर तयार होतात तेव्हा त्या पुनरुत्पादित असतात. या कल्पनात नसेल असे काही असत नाही. मागील प्रतिमांची ती क्रमश: जुळणी असते.

शाळेतील खेळलेला एखादा सामना आपल्याला जसाच्या तसा आठवतो. आपण कसे खेळलो, संघाला विजय कसा प्राप्त झाला या घटना प्रतिमारुपाने मन:पटलावर येतात. ते सर्वच दृश्य मन:पटलावर जसे घडले होते तसे तरळू लागते. आपण जीवनात दुर्दैवाने एखाद्या अपघातात सापडलो असतो तर तो प्रसंग हुबेहुब प्रतिमाच्या रुपाने आपण मनाच्या पडद्यावर चित्रित झालेला पाहतो. त्यामुळे त्या पुनरुत्पादित कल्पना असतात.

## २) रचनात्मक कल्पना

या प्रकरणात प्रतिमांची जुळवाजुळव असते. पूर्वीच्या घटनांची जुळवाजुळव करुन नवीन चित्र उभे केले जाते. आपल्या वर्गाची सहल निघणार असेल तर ती कशी असावी याचे चित्र कल्पनेने रेखाटले जाते. यात मागे घेतलेल्या अनुभव प्रतिमांची जुळवाजुळव असते. पारितोषिक वितरण समारंभ कसा करावयाचा अगदी मंडप घालण्यापासून समारंभ संपण्यापर्यंत सर्व गोष्टींची जुळवाजुळव प्रतिमांच्या माध्यमातून जेव्हा आपण करतो व मनावर त्याचे एक चित्र साकार होते. तेव्हा ती रचनात्मक कल्पना ठरते. रचनात्मक कल्पनांचे पुन्हा दोन उपप्रकार होतात. ते म्हणजे सर्जनात्मक आणि अनुकरणात्मक कल्पना

### १)सर्जनात्मक कल्पना

सर्जनावर अवलंबून असलेली ती सर्जनात्मक कल्पना, कवी, चित्रकार, नाटककार, कादंबरीकार आपल्या कलाकृतीची निर्मिती करताना नवनवीन कल्पना यात आणतात. इतरांना न सुचलेल्या अशा नवीन कल्पनांचा त्यात समावेश असतो. नाटक, कथा किंवा कादंबरी यात असलेल्या कथांची गुंफण ही एक स्वतंत्र निर्मिती असते. ती सर्जनात्मक कल्पना होय. एखाद्याची सर्जनक्षमता जेवढी जास्त तेवढ्या त्याच्या कल्पना उच्च ठरतात. शास्त्रज्ञांनी लावलेले शोध, तत्त्वज्ञांनी सांगितलेली तत्त्वे, सिद्धांत अभियंत्यांनी तयार केलेले इमारतीचे आराखडे या सर्व गोष्टींचा अंतर्भाव सर्जनात्मक कल्पनात होतो.

### २) अनुकरणात्मक कल्पना

रचनात्मक कल्पनेचा हा उपप्रकार होय. एखादी कथा किंवा कादंबरी असताना यातील प्रसंग आपल्या मन:यक्षूसमोर उभे राहतात. वास्तविक ती मूळची कल्पना दुसऱ्या कोणाची तरी असते. पण ती आपण अनुभवत असतो. आपल्या मन:पटलावर ती कल्पना साकार होत असते. अशा कल्पनेला अनुकरणात्मक कल्पना असे म्हणतात. दुसऱ्यांनी वर्णन करुन सांगितलेले प्रसंग जेव्हा आपण केवळ कल्पनेने अनुभवतो तेव्हा त्या अनुकरणात्मक कल्पना असतात.

अ) व्यावहारिक कल्पना

जेव्हा एखादी कृती कल्पनेच्या माध्यमातून साकार होत असताना मूलभूत सिद्धांत, नियम, उपयुक्तता यांचा विचार केलेला असतो. तेव्हा ती व्यावहारिक कल्पना असते. रस्ते, पूल, घरे कितीही कल्पनारम्य असली तरी त्यांचा उपयोग व्यावहारिक पातळीवर होणे आवश्यक असते. गुरुत्वाकर्षण, गतीविषयक नियम, पदार्थावरील दाब इत्यादी सिद्धांत व्यावहारिक कल्पनेत विचारात घेतलेले असतात. थोडक्यात अशा नियम सिद्धांत उपयोग यांनी बद्ध असलेल्या बाह्य परिस्थितीचे व्यावहारिक कल्पनांवर नियंत्रण असते.

ब) स्वैर कल्पना

स्वैर कल्पना म्हणजे अनिर्बंध कल्पना होत. कोणतेही नियम या प्रकारच्या कल्पनेने पाळलेले नसतात. या कल्पनेत मोगली सिंह, लांडगा, अस्वल यांच्याशी आपल्या भाषेतुन बोलतो. या प्रकारच्या कल्पनाविश्वात घोडा आकाशात उंच उडतो, राक्षसाचे डोके आभाळाला टेकलेले असते. मासा होडी ओढत नेऊन हिमालयाच्या शिखरावर ठेवतो. माणसाला पंख असतात. स्वैर कल्पनेत आपण क्षणार्धात अमेरिकेच्या व्हाईट हाऊसमध्ये जाऊ शकतो. सर्व सुरस, अदभूत चमत्कारिक कथांचा , मनोराज्याचा यात समावेश होतो. व्यावहारिक व वास्तववादी जीवनातील कंटाळा तोच तोचपणा घालविण्यासाठी मनाला थोडा दिलासा मिळविण्यासाठी या स्वैर कल्पना चांगल्या असतात. झोपेत कल्पनारम्य स्वप्ने स्वैर कल्पनेत समाविष्ट आहेत. पण मर्यादा ओलांडून स्वैर कल्पना जीवनात आली तर मात्र तो चिंतेच्या विषय ठरु शकतो.

क) सौंदर्यनिष्ठ कल्पना

सर्जनात्मक कल्पनेचा हा आणखी एक प्रकार ज्या कलेत भरपूर कल्पना विलास असतो. मन मोहून टाकण्याची क्षमता असते. ज्यातून आपणास एक वेगळाच आनंद मिळतो. त्या कलांचा सौंदर्यनिष्ठ कल्पनेत समावेश होतो. उपयुक्तता हा निकष येथे लावला

जात नाही. चित्रकार आणि साहित्यिक यांचा कल्पनाविलास यात मोडतो. कलावंतानी स्वत:वर काही बंधने घालून घेतलेली असतात. या रचना आपणास मनस्वी आनंद देतात.

व्यक्तीच्या रचनात्मक कल्पनेचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने कल्पनेवर आधारित असा प्रयोग मॅसेलॉनची पद्धत म्हणून आपण मानसशास्त्रीय प्रयोगशाळेत करु शकतो. प्रायोगिक मानसशास्त्रातील हा प्रयोग करुन आपली रचनात्मक कल्पना अजमावू शकतो.

### ३.४.१.३ भाषेमध्ये कल्पनेचे महत्त्व

भाषेमध्ये भाषाग्रहणाइतकेच भाषा प्रकटीकरणासही महत्त्वाचे स्थान आहे. प्रकटीकरणात्मक उद्दिष्टात प्रत्येक व्यक्तीस आपले विचार भावना, कल्पना, शुद्ध, स्पष्ट, मुद्देसूद व परिणामकारकपणे व्यक्त करता आले पाहिजेत.

भाषेमध्ये लेखनाला फार महत्त्व आहे. लेखन म्हणजे आत्माविष्कार होय. लेखनात कल्पना सौंदर्यालाही महत्त्व आहे. कल्पनामुळे विद्यार्थी आपले मत विचार लेखनातून योग्य रीतीने व्यक्त करु शकतात. त्यामुळे विद्यार्थीची कल्पनाशक्ती विकसीत होते. विचारांना चालना मिळते, गती मिळते. विद्यार्थ्यांना त्यांच्या भावना व्यक्त करता येतात. कल्पनेमुळे विचारक्षमताही विकसित होते.

पाठ्यांशातील कल्पना विद्यार्थ्यांना समजल्या तर विद्यार्थ्यांच्या कल्पना शक्तीस चालना मिळेल. त्यामुळे ते गद्य व पद्य पाठ्यांशाचा अधिक चांगल्या रसास्वाद घेऊ शकतील. त्यातूनच एखादा नवा साहित्यिक, शास्त्रज्ञ तयार होईल. म्हणून विद्यार्थ्यांना कवितेतील कल्पना उलघडून दाखविणे गरजेचे आहे.

यासाठी प्रस्तुत संशोधनात आशयघटक कल्पनेनुसार पाठ्यांशाचे पाठनियोजन करुन शिक्षक प्रशिक्षणार्थीच्या अध्यापनात कोणता फरक पडतो हे पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ३.४.१.४ कल्पनेचे शैक्षणिक महत्त्व

१) कल्पनाशक्तीचे जीवनात खूप महत्त्व आहे आणि म्हणून शिक्षकाने मुलांची कल्पनाशक्ती विकसित करण्याकडे खूप लक्ष दिले पाहिजे.

२) व्यक्तीची कल्पकता ही भाषा, अभिनय, कला, क्रीडा इत्यादी माध्यमातून व्यक्त होते. लहान मुले काठीचा कधी घोडा म्हणून कधी बंदूक म्हणून तर कधी आजोबाच्या हातातील काठी म्हणून उपयोग करतात. लहान मुलांना खेळ आवडतात म्हणून खेळाच्या माध्यमातून त्यांची कल्पनाशक्ती विकसित करण्याचा प्रयत्न करावा.

३) निरनिराळी चित्रे काढणे व रंगविणे चिकणमातीपासून वस्तू तयार करणे, विविध प्रकारचे पोशाख तयार करणे व सोंगे वठविणे इत्यादी कृतीद्वारे मुलांना आपल्या कल्पनांचा आविष्कार करण्याच्या भरपूर संधी दिल्या पाहिजेत.

४) एका शब्दासाठी अनेक शब्द योजणे, गोष्ट व निबंधाना शीर्षक सुचविणे, आराखड्यावरुन गोष्ट पूर्ण करणे, कलपनांचा विस्तार करणे, निबंध लिहणे, कविता लिहिणे, कथा सांगणे इत्यादी गोष्टीतुन मुलांच्या कल्पकतेला वाव देणे.

५) सुतारकाम, बागकाम, यंत्रकाम इत्यादी विविध प्रकारच्या कार्यानुभवातुन विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक कल्पना विलासास संधी द्यावी.

६) विज्ञानात प्रयोग करणे, प्रयोगाची मांडणी करणे, उपकरणे तयार करणे, यावर भर द्यावा. इतिहासात नाट्यीकरण करुन घ्यावे, भूगोलात निरनिराळ्या देशातील लोकांची माहिती चित्रे, प्रतिकृती यांचा वापर करावा. गणितात उदाहणे तयार करणे, कोडी सोडविणे इत्यादीतून त्यांची कल्पनाशक्ती विकसित करणे.

७) चित्रकला, रांगोळी स्पर्धा आयोजित कराव्यात. निबंध व काव्यस्पर्धा आयोजित कराव्यात. गायन, वादन स्पर्धेत मुलांना भाग घेण्यास सांगावे. वर्गाची सजावट करण्यास सांगावे.

८) मुलांना वाचन, कथाकथन, लेखन या गोष्टी प्रथम शिक्षकांनी करुन दाखवाव्यात व विद्यार्थ्यांना अनुकरण करण्यास सांगावे.

९) नवीन ज्ञान, अनुभव देताना त्याचा जुन्या अनुभवाशी संबंध जोडावा. अध्यापन करताना साहचर्याच्या नियमांचा उपयोग करावा.

१०) लहान मुलांना अक्षरे शिकविताना अक्षरांचा संबंध योग्य चित्रांशी जोडावा.

११) नवीन ज्ञान देताना मुलांना ज्ञात असलेल्या गोष्टीशी त्याचे साधर्म्य दाखवावे. यामुळे साहचर्य निर्माण होऊन आकलनास मदत होते.

१२) मुलांचा शाळेतील पहिला अनुभव फार महत्त्वाचा आहे. प्रथमदर्शनीच त्यांच्या मनावर शाळेच्या वातावरणाची छाप पडली पाहिजे. यामुळे मूल शाळेकडे आकर्षित होईल व शाळेतील सर्व कार्यक्रमात रस घेईल.

१३) कौशल्य संपादनासाठी वारंवार उजळणी करणे आवश्यक असते. समजून उमजून अध्ययन करावे.

१४) अमूर्त विचार व कल्पना स्पष्ट कराव्यात त्यासाठी चित्रांचा व प्रतिकृतींचा वापर करावा.

१५) योग्य पद्धतीने साहचर्य संबंध प्रस्थापित करावेत. त्यामुळे ज्ञान एकजीव होते व चांगले पक्के होते.

## ३.४.२ भावना

### संकल्पना

भावना या मराठी शब्दास इंग्रजीमध्ये Emotion असे म्हणतात. Emotions हा शब्द Emovere या मूळ लॅटिन शब्दापासून बनलेला आहे. Emovere म्हणजे प्रक्षुब्ध होणे. भडकणे, अस्वस्थ होणे होय. भावनानुभ जेव्हा येतो तेव्हा प्रचंड प्रमाणात शरीरांतर्गत व शरीरबाह्य भागात उलथापालथ होते. खळबळ माजते.

ऑक्सफर्ड शब्दकोशात भावना या शब्दाचा अर्थ मनाची कोणत्याही प्रकारची प्रक्षुब्धता किंवा अस्वस्थता, मनोविकारात्मक, आवेशात्मक किंवा उद्दीपित अवस्था म्हणजे भावना क्रोध, दु:ख, भीती, आनंद, प्रेम, आश्चर्य, किळस, लज्जा, आदर, कृतज्ञता, राग, द्वेष, मत्सर इत्यादी प्रकारच्या भावना असतात. या भावनांतील काही भावना धन आणि काही भावना ऋण मानल्या जातात.

### ३.४.२.१ व्याख्या

१) उत्तेजक व प्रेरक गुणधर्म असलेली चेहऱ्यावरील आणि शारीरिक हावभावांनी युक्त अशी जाणिवेची व्यक्तिनिष्ठ स्थिती किंवा अवस्था म्हणजे भावना होय.[१०]

मॉर्गन आणि किंग्ज (१९८४)

२) जागृत अवस्थेमधील व्यक्तिनिष्ठ भावनानुभव, राग, भीती, आनंद, खिन्नता, आश्चर्य, किळस यासारख्या सुखात्मक व दु:खात्मक भावाविष्कारांना भावना असे म्हणतात.[११]

क्लिगीना व क्लिगीना (१९८१)

३) रॉबर्ट प्लुटचिप (१९८०) आणि स्ट्रॉंगमन (१९८७) यांनी जवळजवळ ३० वेगवेगळ्या पद्धतीनी भावना म्हणजे काय ते स्पष्ट केले आहे. सर्व व्याख्यांमध्ये खाली स्पष्ट केलेल्या चार मध्यवर्ती वैशिष्ट्यांचा समावेश आढळतो.

- उद्दीपक परिस्थितीचे संवेदन होताच व्यक्तीच्या प्रतिक्रियांना सुरवात होते.

- सकारात्मक किंवा नकारात्मक अनुभवाची जाणीव
- शरीरांतर्गत व शरीरबाह्य स्तरावर योग्य ते बदल घडून येतात.
- प्रकट वर्तन किंवा निरीक्षण योग्य वर्तन प्रकार

वरील सर्व व्याख्यांवरुन आपल्याला असे म्हणता येईल की,

"भावना म्हणजे व्यक्तीला होणारी मानसिक किंवा शारीरिक पातळीवर सुखदायक किंवा दु:खदायक अनुभूती होय."

### ३.४.२.२ भावनेचे स्वरुप

भावनिक अनुभव व्यक्तीला क्षणोक्षणी येतात. त्यांचे स्वरुपही व्यापक असते. भावनानुभव नेहमी बदलत असतात. पण भावना म्हणजे काय हे सांगणे थोडे कठीण आहे.

काही भावनांमुळे व्यक्तीला आनंद होतो.

उदा. आनंद, प्रेम, आदर इत्यादी


काही भावनामुळे व्यक्तीला दु:ख होते.

उदा. किळस, मत्सर

या भावनांचा आविष्कार वेगवेगळ्या भाषा, ध्वनी, हावभाव, कृती इत्यादी प्रकारातून अभिव्यक्त होत असतो. दैनंदिन जीवनात आपण त्याचा प्रत्ययही घेत असतो. भावनांचा प्रत्यय व्यक्तिगत पातळीवर असतो. त्याची अभिव्यक्ती यशातथ्य करता येत नाही. पण तिचा अनुभव संमिश्रपणे घेता येतो. भावनांची उत्कटता व्यक्तिसापेक्ष असते. तसेच भावनेची तीव्रता व कालावधी भिन्न भिन्न असतो. व्यक्तीच्या जीवनातील भावनांचा अल्पाविषकार त्यांची मन:स्थिती (मूड) दर्शविते. तर दीर्घाविष्कार त्याचा स्वभाव ठरविते. त्यावरुन आनंदी स्वभावाचा, रागीट स्वभावाचा, चिडचिड्या स्वभावाचा असे व्यक्तीचे वर्गीकरण आपण करतो. व्यक्तीच्या भावनांचा त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. त्यामुळे व्यक्तीला स्वत:च्या भावनांचे व्यवस्थापन करुन सुसमायोजन

साधता आले पाहिजे. तज्ञ मार्गदर्शकाच्या सहकार्याने भावनांचा विकास करणे हे व्यक्तिजीवनाच्या साफल्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. परिपक्वता, संतुलन आणि प्रगल्भता ही भावना विकासाची अंगे आहेत. भावनांचे संतुलन, परिपक्वता, प्रगल्भता आणि त्यांची सुयोग्य अभिव्यक्ती यांच्याशी भावनिक बुद्धिमत्ता संबंधित आहे. विद्यार्थ्याला स्वत:च्या व इतरांच्या भावना समजून घेण्यासाठी भावनिक बुद्धिमत्ता उपयोगी पडते. यासाठी भावना कशी निर्माण होते हे पाहणे गरजेचे आहे.

भावनाची निर्मिती




आकृती क्र.३.९ भावनेची निर्मित्ती

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, जेव्हा व्यक्ती एखादा भावनिक अनुभव घेते. तेव्हा शरीरांतर्गत तसेच शरीरबाह्य हालचालीमध्ये प्रचंड फेरबदल घडून येतात. आंदोलने निर्माण होतात व व्यक्तीची इच्छा असो व नसो तरीही एक प्रकारच्या अस्वस्थतेमधून त्यास जावे लागते.

### ३.४.२.३ भावना आणि प्रेरणा (Relationship to motivation )

भावना आणि प्रेरणा Emotion - Emoneve - To Emove हे दोन्हीही शब्द या लॅटिन शब्दांपासून उत्पन्न झालेले आहेत. प्रक्षुब्ध करणे, हलवून सोडणे असे त्याचे स्वरुप आढळते. त्यामुळे या दोहोत वरवर पाहता काहीच फरक आढळत नाही. त्यांच्यातील सीमारेषा अतिशय अस्पष्ट व धूसर अशी आहे. भावना व प्रेरणा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटले तरी चालेल.

भावना आणि प्रेरणा याचेतील साम्य

प्रेरणा निर्माण झाल्यानंतर व्यक्तीमध्ये असमतोल निर्माण होतो. अस्वस्थता निर्माण होते. तशीच ती भावनानुभवामुळेही होते. उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने प्रयत्न करण्यामागे प्रेरणा तसेच भावना समानरीत्या कार्यान्वित होतात. प्रेरणा पूर्ण झाल्यानंतर जे समाधान प्राप्त होते तसेच समाधान विशिष्ट भावानुभवामुळेही प्राप्त होते. उदा- भुकेची प्रेरणा पूर्ण झाल्यानंतर व्यक्तीला समाधान मिळते. तसेच भुकेची भावना नाहीशी झाल्यानेही त्याला समाधान मिळते.

प्रेरणा निर्मितीबरोबर शरीरामध्ये शक्तिसंचयन होते व व्यक्ती विशिष्ट क्रिया करण्यासाठी तत्पर होते. भावनेमुळेही नेमका असाच बदल घडून येतो. भीतीची भावना निर्माण झाल्यानंतर परिस्थितीपासून दूर पळून जाण्यासाठी वेगाने पळावे लागते

प्रेरणा आणि भावना यांमधील भेद

प्रेरणा आणि भावना यामध्ये महत्त्वाचा फरकही आढळतो. बऱ्याचशा प्रेरणा या शारीरिक गरजांमुळे निर्माण होतात तर परिस्थितीची जाणीव व्यक्तीला कशी होईल, त्यांचे बोधन कसे होईल यावर भावनांची निर्मिती अवलंबून असते. २-३ वर्षे वयाच्या मुलाला 'साप' म्हणजे काय हे माहीत नसल्याने 'भीती' ही भावना निर्माण होणारच नाही. भावनानुभवामध्ये परिस्थितीचे संवेदन-बोधन आणि विचार प्रक्रिया महत्त्वाच्या मानल्या जातात.

प्रेरणांचे अधिष्ठांन शारीरिक गरजा हे होय. प्रेरणा पुन:पुन्हा उद्‌भवतात. त्यांच्यात चक्राकार गती आढळते. एकच प्रेरणा वारंवार निर्माण होते. भावनांबाबत अशी चक्राकार गती आढळत नाही किंवा प्रतिक्रिया देखील नेहमीप्रमाणेच न दिली जाता वेगळ्या पद्धतीने दिली जाईल. किंवा कोणतीही भावनिक प्रतिक्रिया दिली जाणार नाही. उदा. रस्त्यावरुन जाताना एखादी व्यक्ती आपणाकडे पाहून हसते तेव्हा सुरुवातीस त्याच्या

हसण्याचा राग येईल, तो वेडा माणूस आहे हे कळल्यानंतर मात्र आपणास अजिबात राग येणार नाही.

प्रेरणांची पूर्तता ही ठरावीक साचेबद्ध पद्धतीच्या वर्तनाने करावी लागते असा साचेबंदपणा भावना निर्मितीमध्ये असेलच असे नाही. प्रेरणा तृप्त झाल्या की त्यांचे आस्तित्वच तात्पुरते संपते व मनुष्य शांत होतो. भावनिक अनुभव मात्र वारंवार येऊ शकतात. चिंता, भीती, द्वेष यासारख्या दु:खदायक भावनांचे अस्तित्व एखाद्या व्यक्तीला छळत असते. काही भावना या व्यक्तीच्या मृत्यूबरोबरच संपतात.

तात्पर्य, प्रेरणा ही एक सर्वसमावेशक संकल्पना असून एखादी क्रिया पार पाडण्यासाठी आवश्यक त्या आंतरिक घडामोडीचा त्यात समावेश होतो. तर भावना ही एक अत्यंत गुंतागुंतीचे व संकीर्ण कल्पना असून त्यामध्ये व्यक्तिगत अनुभव व त्या अनुभवांचे बोधन महत्त्वाचे मानले जाते. विशिष्ट प्रेरणांनी प्रेरित झालेली व्यक्ती शारीरिक पातळीवर कार्यप्रवृत्त होताना आढळते. तर भावनानुभवामुळे व्यक्ती ही अधिकतर शारीरांतर्गत पातळीवर कार्यान्वित होताना आढळते.

प्रेरणा व भावना यामध्ये चक्राकार गती आढळून येते. प्रेरणायुक्त वर्तन करणारी व्यक्ती विविध भावनांचा अनुभव घेताना आढळते. तहान, भूक, निंदा, लैंगिकता, कर्तृत्व, प्रतिष्ठा, मान्यता यासारख्या प्रेरणांची परिपूर्ती झालेली व्यक्ती आनंदी, उत्साही, समाधानी आढळते. भावनामुळे व्यक्तीची मानसिक पूर्वतयारी होऊन प्रेरणायुक्त वर्तन करते. परिस्थितीशी समायोजन करण्यासाठी अशा वर्तनाची आवश्यकता असते. स्वत:च्या वर्तनामध्ये आवश्यक ती लवचीकतापणा आणण्यासाठी भावना अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात. व्यक्तिगत पातळीवरील अशा भावनामुळेच व्यक्ती प्रेरणांची पूर्ती करण्याची धडपड करताना आढळते. प्रेरणा व भावना या ऐकमेकांशी इतक्या घट्टपणे बांधल्या गेल्या आहेत की, त्याना परस्परापासून विलग करणे अत्यंत कठीण काम आहे.

### ३.४.२.४ भावनेची कार्ये (Function of Emotions)

मानवी जीवनाचे महावस्त्र बुद्धीच्या धाग्यांमुळे तयार होते व त्याला रंग भावनांचा असतो. भावनेच्या ओलाव्यामुळेच माणसे परस्पराजवळ येतात तर भावनिक शुष्कतेमुळे ती दूर जातात. कोणतीही एकच भावना मानवी जीवन व्यापून राहिली तर व्यक्तिमत्त्वाला एकसुरीपणा येतो. आनंद , दुःख, हर्ष, खेद, प्रेम, तिरस्कार, उत्कंठा,उदासीनता, वासल्य,द्वेष अशा अनेकविध भावनिक अनुभवांमुळे आपले जगणे अर्थपूर्ण बनते.

शेरेर (१९८४) म्हणतो की, मानवी जीवन जगण्यासाठी अर्थपूर्ण बनविणे एवढीच भावनांची भूमिका नाही तर त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे कार्य या भावनांचे असते. ती कार्ये पुढीलप्रमाणे -

#### १) शक्तिसंचयन किंवा क्रियात्मकता

सभोवतालचे उद्दीपक घटक व त्याला दिल्या जाणाऱ्या प्रतिक्रिया यामधील दुवा म्हणजे या भावना होत. भावनांमुळे शारीरिक क्रिया, शक्तिसंचयन किंवा क्रियात्मकता वाढते. उदा. भीतिदायक भावना. कुत्रे पाठीमागे लागले असता त्याच्या चावण्याच्या भावनेची जाणीव होताच वृक्कस्थ ग्रंथीमधून सर्वप्रथम ॲड्रेनलिन नावाचा स्त्राव अधिक वेगाने तयार होतो. ॲड्रेनेलिन यकृतात शिरुन तयार झालेली साखर रक्तात सोडली जाते. हृदयस्पंदने वाढविली जातात. रक्तभिसरणाचा वेग वाढतो, रक्तदाब वाढतो, स्नायूंवरील नियंत्रण वाढते रक्तप्रवाहामध्ये ग्लायकोजेन सोडले जाते. या सर्वांचा परिणाम म्हणून शरीरामध्ये प्रचंड शक्ती, जोम निर्माण होतो व ती व्यक्ती वेगाने पळू लागते. आणिबाणी प्रसंगी सुटका करुन घेता यावी यासाठी संपूर्ण शरीर क्रियाशील बनते. वाढदिवस, विवाहसोहळा, सहल, पिकनिक, जिकण्याची जिद्द या प्रसंगी आपल्यामध्ये एवढा उत्साह कोठून येतो हे यावरुन ध्यानात येते. तात्पर्य, शक्तिसंचयन किंवा क्रियात्मकता हे भावनांचे महत्त्वाचे कार्य होय.

**२) वर्तनाला आकार देणे**

मानवाने जीवन हे अनुभवांची गोळाबेरीज असते. विशिष्ट भावनिक अनुभव आल्यानंतर आपण त्यास कशा प्रतिक्रिया देतो. यावरुन भविष्यातील वर्तनांची दिशा निश्चित केली जाते. सुखद भावनानुभव आलेले असतील तर तसेच अनुभव वारंवार यावेत असे आपण वर्तन करतो.

उदा- एखादी व्यक्ती आपल्याला मित्र म्हणून आवडते. त्या व्यक्तीचा सहवास सुखद वाटतो. एवढ्यावरुन भविष्यात आपण असे वर्तन करु लागतो की जेणेकरुन भविष्यात सुखद अनुभव वारंवार येत राहतील, अशी व्यक्ती आपल्याकडून दुरावली जाणार नाही याची खबरदारी घेऊन ती व्यक्ती आणि आपण यामधील वैचारिक, भावनिक बंध अधिकाधिक दृढ कसे होतील इकडे लक्ष देतो. समाज जीवनामध्ये वर्तनाला आकार देण्याचे काम भावनांना करावे लागते.

**३) सामाजिक आंतरक्रियांचे नियमन**

शाब्दिक तसेच अशाब्दिक स्वरुपात आपण भावना व्यक्त करीत असतो. व्यक्ती सध्या कोणता अनुभव घेत आहे व भविष्यात ते अनुभव कशा प्रकारचे असतील यांचा अंदाज बांधण्यासाठी या भावनांचे ज्ञान उपयुक्त ठरते. यातूनच परिणामकारक व सुयोग्य अशा सामाजिक आंतरक्रिया घडून येतात.


उदा- विजेचा कडकडाट ऐकताच २ वर्षाचे लहान मूल प्रचंड घाबरलेले पाहताच चटकन त्याला त्याची आई उचलून घेते. त्या मुलाला सुरक्षित वाटते, त्याला आधार मिळतो. भविष्यात जेव्हा अशा विजांचा कडकडाट निर्माण होईल तेव्हा ते मूल आईच्या सहवासात स्वत:ला सुरक्षित ठेवेल अशा विविध अनुभवांमधून व्यक्तीच्या सामाजिक आंतरक्रियांचे नियमन केले जाते.

### ४) भावनात्मक प्रेरणा

व्यक्तीला येणारे भावनानुभव हे प्रेरणात्मक स्वरुपाचे असतात. उपाशी किंवा भुकेलेल्या प्राण्याला अन्नपदार्थ न मिळाल्याने अप्रिय भावना जाणवतात. यातूनच अन्न मिळविण्याची धडपड करतो. ही धडपड म्हणजे प्रेरणा होय. तसेच भीतीदायक उद्दीपकामुळे घाबरलेला प्राणी दूर पळण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो उद्दीपक टाळण्याची प्रेरणा कार्यान्वित झालेली असते. यासारख्या अनुभवांमध्ये भावनेतून प्रेरणेची निर्मिती झाल्याचे आढळून येते. सुखकारक भावनांचा पाठपुरावा करणे तर दु:खकारक भावना दूर सारणे हे जीवनाचे मुख्य उद्दिष्ट आहे, हे उद्दिष्ट म्हणजे जगण्यामागील प्रेरणा होय.

## ३.४.२.५ भावनेची वैशिष्ट्ये (Characteristics of Emotion)

भावनिक अनुभवांमुळे व्यक्तीचे अंतरंग ढवळून निघते. भावनानुभव हे विविध स्वरुपात असतात. काही भावानुभव हे आपणास हवे असतात तर काही भावानुभव आपण टाळण्याचा प्रयत्न करीत असतो. हव्या असणाऱ्या भावना सुखद असतात तर नको असणाऱ्या भावना दु:खद असतात. सर्वसाधारणपणे भावनांची विभागणी दोन मुख्य प्रकारे केली जाते.




आकृती क्र.३.१० भावनेचे प्रकार

**मेंटल हेल्थ कौन्सील (१९९५)**

किती वेगवेगळ्या भावनांचा आपण अनुभव घेत असतो यांची यादी करणे खूप कठीण आहे. मेंटल हेल्थ कौन्सिलने मूलभूत सहा भावना आपण अनुभवत असतो असे स्पष्ट केले. यापेक्षा वेगळ्या भावनांचा अनुभव म्हणजे या सहा भावनांचे मिश्रण असते. शेव्हर व ओकोनेर (१९८७) यांच्या मते, प्रेम, आनंद, आश्चर्य, क्रोध, दु:ख आणि भीती या सहा मूलभूत भावना होत. संपूर्ण जगामध्ये सर्व मानवांमध्ये याचे सहा भावनांचे अस्तित्व आढळते. यातील प्रेम, आनंद, व आश्चर्य या सकारात्मक किंवा धनात्मक भावना होत तर क्रोध, दु:ख व भीती या नकारात्मक किंवा ऋणात्मक भावना होत.

आनंद-सुख

अगदी सुरुवातीस लहान मुलांमध्ये उत्तेजित अवस्था आढळते. त्यातूनच आनंद, सुख, हर्ष, आश्चर्य यासारखे भावनाविष्कार अनुभवले जातात. उद्दिष्ट प्राप्तीनंतर असा सुखद भावनानुभव येतो. आपल्याला हवे ते प्राप्त झाल्यानंतर लहान मुलापासून ते वृद्धापर्यंत सर्वांना प्रसन्नता लाभते.

दु:ख

वर उल्लेख केलेल्या भावनेच्या एकदम विरोधी भावना म्हणजे दु:ख होय. अपेक्षाभंग, वियोग, अपयश, यासारख्या कारणांमुळे व्यक्ती दु:खी होतात. उद्दिष्ट प्राप्तीमध्ये अडथळे निर्माण झाल्यास व्यक्ती निराश होते व दु:खद अनुभव येतात.

### ३.४.२.६ भाषेत भावनेचे महत्त्व

माणूस हा भावनाप्रधान प्राणी आहे. माणसांच्या जीवनात जसे विचारांना महत्त्व आहे. तसेच भावनांनाही अनन्यसाधारण महत्त्व आहे. माणसाच्या जीवन सागरात भावनांच्या लाटा सतत निर्माण होत असतात. मानवाच्या जीवनात भावनांचे पोषण होणे

तसेच भावनांचा विकास होणे हे मानसिक स्वास्थ्य मिळविण्याचे दृष्टीने महत्त्वाचे असते. आपल्या नित्य जीवनात वेगवेगळ्या प्रसंगातून आपण आपल्या भावना व्यक्त करीत असतो. ते जीवन तुम्ही आम्ही जगतो. ते एका अर्थाने भावजीवनच असते. समृद्ध भावजीवन जगणारी व्यक्ती जीवनाचा आस्वाद खऱ्या अर्थाने घेऊ शकते. आपल्या जीवनात रसिकता, अभिरुची, सद्भावना, सतप्रवृत्ती, सौंदर्य, चारित्र इत्यादी गोष्टींना विलक्षण महत्त्व आहे. हे सर्व घटक भावनांवर आधारलेले आहेत. भाववृत्तीच्या पोषणावरच व्यक्तिमत्त्व घाटदार बनते.

भाषेच्या माध्यमातून माणसाला विविध प्रकारच्या भावनांचा अनुभव येतो. आपण आपले प्रेम, वासल्य, दु:ख इत्यादी भावना भाषेतून व्यक्त करीत असतो. दुसऱ्यांनी शब्दांच्या माध्यमातून व्यक्त केलेल्या भावना जाणून घेतो आणि सहानुभूती व्यक्त करतो. भावनांच्या अनुभवामुळे मानवी जीवन समृद्ध होते. माणसाच्या ठायी स्थिरवृत्ती निर्माण होतात. त्याच्या स्वभावाची जडणघडण होते. तो सुसंस्कारित होतो. भावनांच्या अनुभूतीतून मूल्यांचे संस्कार होतात. आध्यात्मिक, सामाजिक, मानवी मूल्यांची जोपासना या भावानुभूतीमुळे घडते. मानवाच्या घडणीची ही कार्ये भाषेमुळे होतात.

भाषेने निर्माण केलेल्या साहित्यातूनही भावजागृती होते. साहित्याच्या वाचनातून भावनांचे भरण पोषण होते. माणसाच्या रुक्ष आणि खडतर जीवनात भावनांचा शिडकावा साहित्याच्या वाचनातून होतो. माणसाचे जीवन समृद्ध होते. भावनांचे उदात्तीकरण होते. सौंदर्याचे पोषण होते. साहित्य माणसाच्या मनात आनंदाचे मळे फुलवते. उजाड माळरानाचे नंदनवन व्हावे तसे रुक्ष व निरस जीवनाचे भावपूर्ण जीवन घडवून त्यात अलौकिक आनंद निर्माण करण्याचे कार्य साहित्य करते. जीवनाची अनुभव गाथा माणसाने भाषेच्या माध्यमातून लिहली. काळाच्या ओघात प्रवाहपतित न होता जे जीवनानुभव चिरंजीव झाले. ते साहित्य अभ्यासून आजही कितीतरी प्रकारांनी माणसाचे जीवन समृध्द होते.

मराठी विषयाच्या पाठ्यांशामध्येही साहित्याचे उतारे समाविष्ट केलेले असतात. त्यातील भाव हा पाठ्यांशाच्या मदतीने विद्यार्थ्यापर्यंत पोहचविण्यासाठी आशयघटकानुसार पाठनियोजन करुन, त्यानुसार अध्यापन करुन विद्यार्थ्यांचा भावनिक विकास साधण्याच्या दिशेने या संशोधनाचा प्रयत्न आहे.

### ३.४.२.७ भावनेचे शैक्षणिक महत्त्व

विद्यार्थी व्यक्तिमत्त्वाचा भावनिक विकास हे एक शिक्षणाचे उद्दिष्ट आहे म्हणून मुलांच्या विविध भावनांचा विकास करणे आवश्यक असते.

१) व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्यार्थ्यांच्या भावनांना आवाहन करणारे विषय अभ्यासक्रमात ठेवले पाहिजेत.

२) मराठी, इतिहास यासारख्या विषयामध्ये असणारे पाठ केवळ माहितीवर न ठेवता ते विद्यार्थ्यामध्ये प्रेम, निष्ठा, दया, सहकार्य इत्यादी गुणांच्या विकासाला वाव देणारे असावेत.

३) विद्यार्थ्यांच्या भावनांच्या हितकारक आविष्काराला संधी दिली पाहिजे. प्रोत्साहन द्यावे.

४) समाजातील आदरणीय व्यक्तीबद्दल आदर निर्माण करावा.

५) तसेच अन्यायासंबंधी चीड किंवा राग निर्माण होणे देखील आवश्यक आहे.

६) भाषा विषयाच्या अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या भावनेला पोषक वातावरण तयार करता येते.

७) इतिहासातून ऐतिहासिक पुरुषांच्या पराक्रमातून त्यांचाबद्दल आदर निर्माण करता येतो.

८) कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या भावना दडपू नयेत.

९) कथा, कविता, निबंधलेखन तसेच नाटय, चित्रकला, हस्तकला यामधून विदयार्थ्यांच्या भावनांच्या आविष्काराला वाव दयावा.

१०) ज्ञान होणे जितके महत्त्वाचे तितकेच संवेदनशीलता अंगी असणे महत्त्वाचे याची जाणीव विद्यार्थ्यांना द्यावी.

११) भावनाविष्कार करीत असताना आपल्या मनाचा तोल ढळू नये याबाबतची जाणीव विद्यार्थ्यांना द्यावी.

१२) स्वतःचे वर्तन देखील भावनाविष्काराच्या प्रसंगी समतोल राहील याची काळजी शिक्षकाने घ्यावी.

### ३.४.३ विचार (Thinking)

विचारप्रक्रिया सर्वपरिचित आहे पण तिचे शास्त्रीय रुप काय आहे हे जाणून घेतले पाहिजे. भाषा व संकलन ही विचारप्रक्रियेची दोन साधने आहेत. त्याचप्रमाणे सामान्यीकरण प्रभेदन आणि निष्कर्षण यांचाही ती आधार आहेत. विचारांची व्याख्या करणे कठीण आहे. पण विचाराचे खालील निकष दिसून येतात. विचार हा बहुतांशी सामान्य असतो. त्यामध्ये वर्ग किंवा गट यांचे विशेष विचारात घेतले जातात. म्हणून त्याला संकल्पनात्मक विचार असे म्हणतात. दुसरा विशेष म्हणजे विचारात अलग गोष्टीपेक्षा त्या वर्गाशी किंवा तत्सम वर्गाशी असलेला संबंध लक्षात घेतला जातो. विचार हा अमूर्त गोष्टींचा वापर करतो. मला एखाद्या गोष्टींचा अवबोध होतो. परंतु त्याच्या ठिकाणी असलेल्या उदारपणाचा मी विचार करतो. अशा रीतीने विचार म्हणजे वस्तूचा विशेष हुडकणे, तो बाजूला करणे म्हणून विचारात नेहमी प्रामुख्याने विश्लेषण व संश्लेषण यांचा संबंध येतो. विचार हा एक जाणण्याचा अगर बोधनाचा क्रियाप्रकार आहे. परंतु हे जागणे विशिष्ट वस्तूच्या निव्वळ अनुभवापेक्षा वरच्या दर्जाचा असते. ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. विचार हा भूत भविष्यात शिरुन एका दृष्टीने काळाच्या मर्यादा ओलांडतो.

### ३.४.३.१ व्याख्या

१) विचार म्हणजे वस्तूचा विशेष हुडकणे, तो बाजूला करणे म्हणून विचारात नेहमी प्रामुख्याने विश्लेषण व संश्लेषण यांचा संबंध येतो. परंतु हे जागणे विशिष्ट वस्तूच्या निव्वळ अनुभवापेक्षा वरच्या दर्जाचे असते विचार हा भूत भविष्यात शिरुन एका दृष्टीने काळाच्या मर्यादा ओलांडतो.[१२]

शैक्षणिक टीपा कोश.

२) Thinking may be described as the conscious adjustment of an organism to a situation.

व्यक्तीने परिस्थितीशी केलेले बोधात्मक पातळीवरील समायोजन म्हणजे विचार[१३]

Collins and Drever

३) Thinking is manipulating aspect of post experiences implicity

विचार म्हणजे निर्णय घेण्यासाठी पूर्वानुभवाचा उपयोग करण्याचा पैलू[१४]

नॉर्मन मन्

४) Thinking is mental activity in its cognitive aspect.

'विचार म्हणजे बोधात्मक बाजूचा मनोव्यापार'[१५]

रॉस

५)'ज्या प्रक्रियेत अवबोध, प्रतिमा, कल्पना, संबोध यासारख्या मानसिक प्रतीकांचा सामान्यपणे वापर केला जातो, अशी बहुधा पूर्व व अदृश्य मानसिक प्रक्रिया म्हणजे विचार होय.'[१६]

गॅरेट

७)'समस्येचे विश्लेषण करुन ती सोडविण्याची योजना तयार करणे म्हणजे विचार होय.[१७]

मोहसिन

## ३.४.३.२ विचारप्रक्रियेतील घटक

विचारप्रक्रियेचे पृथक्करण केल्यास पुढील घटक दिसून येतील.

**१) समस्या**

एखादी समस्या समोर निर्माण झाली म्हणजे विचार प्रक्रिया सुरु होते. पेन हरवला, पेन पाहिजे, त्यासाठी काय करावे याचा विचार एखादा विद्यार्थी करु लागतो.

**२) धडपड**

समस्येची जाणीव होताच विशिष्ट मानसिक धडपड सुरु होते. ही धडपड अर्थात समस्यापूर्तीच्या दिशेने असते. समस्या सोडविण्याचे निरनिराळे मार्ग असतात. कोणता मार्ग जास्त चांगला याचा तो विचार करतो. उदा. आईकडे पेनसाठी पैसे मागावे की बाबांकडे? का मित्राकडून पेनच घ्यावा? असे विचारचक्र सुरु होते.

**३) पूर्वानुभवाचा उपयोग**

समस्या सोडविण्यासाठी पूर्वानुभवांचा उपयोग केला जातो. पूर्वी पेन घेण्यासाठी पैसे मागितले होते. त्यावेळी वडील रागावले होते. तेव्हा आता काय करावे असा त्याचा विचार सुरु होतो. कोणता पर्याय चांगला या संबंधी निर्णय घेतो.

**४) प्रत्यक्ष कृती**

पूर्वानुभवांच्या विविध अंगाची जुळवाजुळव करुन प्रत्यक्ष कृतीचे स्वरुप निश्चित केले जाते.


अशा प्रकारे समस्या निर्माण होणे, ती सोडविण्यासाठी विविध उपायांचा विचार करणे हा विचार करीत असताना आपणास पूर्वानुभांवा उपयोग करणे व नंतर प्रत्यक्ष कृती

कशी करावयाची या दृष्टीने अनुभवांची योग्य ती मांडणी करणे. असे प्रमुख घटक विचार प्रक्रियेत आढळून येतात.

### ३.४.३.३ विचारांचे प्रकार

विचाराचे प्रमुख दोन स्तर

१) अवबोधात्मक     २) संबोधात्मक




आकृती क्र.३.११ विचाराचे स्तर

### १) अवबोधात्मक विचार

अवबोध म्हणजे काय हे आपण पाहू. एखादा उद्दीपक समोर असताना त्याचे संवेदन ज्ञानेंद्रियांना होते. त्या संवेदनाला अर्थ लावला जातो आणि अवबोध तयार होतो. या अवबोधाच्या साहाय्याने जो विचार केला जातो. त्या विचाराच्या स्तराला अवबोधात्मक विचार असे म्हणतात. कुत्रा समोर आल्यानंतर त्याचे दिसणे, त्याचे भुंकणे यांचे संवेदन डोळ्यांना, कानांना होते. हा कुत्रा आहे हा अवबोधही त्याच वेळेला होतो. कुत्र्याच्या गळ्यातील पट्टा पाहून हा पाळलेला कुत्रा आहे हा अवबोध होतो. हा सर्व विचार उद्दीपक समोर असताना होतो. विचाराची ही निम्न पातळी आहे.

## २) संबोधात्मक विचार

उद्दीपक समोर नसतानाही विचारप्रक्रिया सुरु असते असा विचार हा संबोधात्मक स्तरावर सुरु असतो. या स्तरावरील विचारासाठी काही साधनाची गरज असते. निरनिराळे अवबोध, संकल्पना, प्रतिमा, कल्पना, भाषा ही विचारांची साधने आहेत किंवा विचाराची प्रतिके आहेत. म्हणूनच विचराला प्रतीकात्मक कृती (Symbolic behaviour) असे म्हणतात. विचाराची प्रतीके पूर्वानुभवातून मिळविली जातात. प्रतीकांच्या उपयोगामुळे व्यक्तीचे श्रम आणि वेळ वाचतो.

उदा- स्कूटर विकत घ्यावयाची आहे अशा प्रसंगी गावातील निरनिराळ्या दुकानात फिरुन स्कूटरची चौकशी केली जात नाही तर पूर्वानुभवांमुळे घरातल्या सोफ्यावर बसून आपल्याला कोणत्या कंपनीची स्कूटर घ्यावयाची आहे, आपल्याजवळ किती पैसे आहेत, आपली गरज गावातल्या गावात फिरण्याची आहे की, आपल्याला लांबच्या प्रवासासाठी वाहन हवे आहे. या सर्व गोष्टींचा विचार करताना अवबोध, संकल्पना, प्रतिमा अशा प्रतीकांचा वापर केला जातो. विचारांची प्रतीके मुख्यत: चार प्रकारची आहेत १) संकल्पना २) प्रतिमा ३) कल्पना ४) भाषा

प्रथम विचार प्रतिकांचा पाहू.

## ३.४.३.४ विचारांची प्रतीके

### १) संकल्पना

अवबोध तयार झाल्यानंतर त्यामधून संकल्पना तयार होतात. अनेक अनुभवातून अवबोधांच्या विश्लेषण, संश्लेषणातून संकल्पना निर्माण होतात.

कोणत्याही गोष्टीची संकल्पना म्हणजे तुम्ही त्या वस्तूविषयी, त्या अवबोधाविषयी, त्या कल्पनेविषयी किंवा त्या भावनेविषयी जे जे जाणता ती तुमची त्या वस्तू, कल्पना, भावना यांची संकल्पना असते.

निरनिराळ्या वस्तूंच्या किंवा प्रसंगाच्या अवबोधातून एखादी जातिवाचक सामान्य कल्पना तयार होते तेव्हा त्या सामान्य कल्पनेला संकल्पना असे म्हणतात.

संवेदन अवबोध यानंतरची मानसिक प्रक्रिया म्हणजे संकल्पनानिर्मिती.

२) प्रतिमा (Images)

हेही विचाराचे एक प्रतीक आहे. संवेदन आणि अवबोध यामध्ये ज्ञानेंद्रियांसमोर उद्दीपक असतो. पण उद्दीपक समोर नसतानाही जेव्हा त्या अनुभवाचे मानसचित्र अंत:चक्षूसमोर उभे राहते तेव्हा त्या मानसचित्राला प्रतिमा असे म्हणतात. प्रतिमा केवळ दृश्यच असतात असे नाही तर त्या निरनिराळ्या ज्ञानेंद्रियांना जाणवणाऱ्या असतात. प्रतिमाचे पुढील प्रकार आहेत. १) दृक प्रतिमा २) श्राव्य प्रतिमा ३) गंध प्रतिमा ४) स्पर्श प्रतिमा ५) रुची प्रतिमा ६) औष्णिक प्रतिमा ७) गती प्रतिमा ह्या सर्व स्मृती प्रतिमा आहेत. प्रतिमा तयार होण्यासाठी पूर्वानुभव असणे आवश्यक आहे. सर्व प्रतिमांची तीव्रता समान नसते.

३) कल्पना

कल्पना हेही विचारांचे एक प्रतीक आहे. परी, राक्षस, स्वर्ग, नरक या कल्पना आहेत.

वास्तवातील प्रतिमांची जुळवाजुळव करुन नवीन रचना तयार करणे म्हणजे कल्पना.

उदा- परी ही कल्पना तयार करताना जे जे मोहक, सुंदर, आकर्षक ते ते एकत्र करुन त्याची एक रचना केली. गोड, गोंडस, छोटीशी, गोरी गोरी मुलगी, आकाशात दिसणाऱ्या सुंदर चांदण्या, गुलाबी, आकाशी किंवा स्वच्छ पांढरा रंग, फुलपाखराचे पंख हे सगळे एकत्र करुन परीच्या चांदण्या लावलेला गुलाबी फ्रॉक, त्याला लावलेले फुलपाखराच्या पंखासारखे पंख अशी सुंदर, गोरी, गोबरी, छोटीशी परी ज्न्माला आली.

काही कल्पना अवास्तव वाटतात पण त्यांनाही वास्तवाचा थोडासा तरी आधार असतोच, अशा कल्पनांना कवी कल्पना म्हणतात. मात्र बहुतांश व्यक्तींच्या कल्पना या वास्तवाला धरुन असतात.

### ३.४.३.५ विचारप्रक्रियेचे प्रकार

वरच्या पातळीवरील विचारप्रक्रिया विविध तऱ्हेने चालत असते. अनुमान, समस्याविमोचन, चिकित्सक विचार आणि सर्जनशील विचार या सर्वांचा विचारप्रक्रियेत अंतर्भाव होतो. हे चार प्रकार म्हणजे एकाच बौद्धिक व्यापाराची भिन्न भिन्न रुपे आहेत. या सर्वांचा समावेश विमर्षी चिंतन या संज्ञेमध्ये होतो. या चारही प्रकाराचा थोडक्यात विचार करु.

#### १) अनुमान

निरनिराळ्या विधानातील संबंध शोधून आपण निष्कर्ष काढतो. तेव्हा त्याला अनुमान म्हणतात. अनुमान म्हणजे तर्क किंवा निष्कर्ष होय. या तर्क करण्याच्या प्रमुख दोन पद्धती आहेत.

अ) अवगामी पद्धती ब) उद्गामी पद्धती

#### अ) अवगामी पद्धती

एखादी सामान्य नियमाच्या आधारे विशिष्ट उदाहरण पडताळून पाहणे. येथे पूर्वपक्षामध्ये सर्वसामान्य नियम, तर उत्तरपक्षामध्ये विशिष्ट उदाहरणांची त्या नियमाच्या आधारे परीक्षा अशी स्थिती असते.

#### ब) उद्गामी पद्धती

विशिष्ट उदाहरणाच्या निरीक्षणावरुन व परीक्षणावरुन निष्कर्ष प्रस्थापित केले जातात. या प्रक्रियेत अवलोकन, तुलनात्मक, निरीक्षण, विचारमंथन व निष्कर्ष असे चार टप्पे पडतात.

**२) समस्या निराकरण**

एखादी समस्या सोडविण्यासाठी जेव्हा मिळालेल्या अनुभवांचा उपयोग केला जातो, तेव्हा त्याला 'समस्या निराकरण' म्हणतात. त्यात पुढील पायऱ्याने समस्या सोडविली जाते.

१) समस्या निश्चिती करणे

२) संभाव्य पर्यायांची मांडणी करणे

३) संभाव्य पर्यायापैकी योग्य पर्याय निवडणे

४) समाधान अवस्था - समस्या सोडवणूक होते.

**३) चिकित्सक विचार**

दिलेल्या माहितीवरुन एखाद्या परिस्थितीचे जेव्हा मूल्यमापन केले जाते, तेव्हा तो चिकित्सक विचार होय. यात विविध वस्तू, घटना, सूत्रे, तत्त्वे, अवबोध अथवा संबोध यांचे बारकाईने निरीक्षण करुन त्यांचे विश्लेषण करणे, परीक्षण करणे व मूल्यमापन करणे या बाबी चिकित्सक विचारामध्ये येतात. एखाद्या घटनेचा विविध अंगाने अन्वय लावण्याचा प्रयत्न केला जातो.

**४) सर्जनशील विचार/ निर्णायक विचार**

अनुभवाची जुळणी करुन जेव्हा नवीन कृती निर्माण होते तेव्हा त्याला सर्जनशील विचार म्हणतात. एखाद्या घटनेची नवीन अशी रचना कल्पितो त्यास सर्जनशील विचार म्हणतात. नवनवीन शास्त्रीय शोध, साहित्यनिर्मिती, नवनवीन वस्तुशिल्पे, चित्रे इत्यादी या विचाराची उदाहरणे होत. या प्रकारच्या विचार प्रक्रियेमध्ये पूर्वतयारी, उबविणे, प्रेरणा व प्रकाशन व पडताळा किंवा मूल्यमापन या पायऱ्या दिसून येतात.

### ३.४.३.६ भाषेमध्ये विचाराचे महत्त्व

माणसाच्या ज्या अनेक व्याख्या केल्या जातात. त्यात माणूस हा विचार करणारा प्राणी आहे अशी एक व्याख्या केली जाते. माणूस हा विचार करतो म्हणून तो इतर प्राण्यापेक्षा वेगळा मानला जातो. ही विचार करण्याची क्षमता माणसाला भाषेमुळे प्राप्त झाली आहे. विचार हा मूक संवाद असतो. विचारात माणूस स्वतःच स्वतःशी बोलत असतो. शब्दांचा आधार घेऊन त्याचा हा मूक संवाद मनातल्या मनात चालूच असतो. शब्द हे प्रतीकात्मक व सांकेतिक असतात. या शब्दांच्या मदतीने माणूस अमूर्त पातळीवर विचार करु शकतो. ज्यांना भाषा येत नाही त्यांना विचार करण्यासही मर्यादा पडतात. तसेच ज्यांची शब्द संपत्ती भरपूर नसते त्यांच्या विचारांना अर्थातच मर्यादा पडतात. शब्दसंपत्ती आणि बुद्धीचा संबंध असल्याचा निर्वाळा अनेक मानसशास्त्रज्ञांनी दिला आहे.

पाश्चिमात्य शिक्षण मानसशास्त्रज्ञ थॉमसन यांनी लिहलेल्या 'Child psychology' या ग्रंथात ज्यांची शब्दशक्ती उत्तम असते त्यांची विचारशक्ती चांगली असते असे म्हटले आहे. जनावरांना भाषेच्या अभावी विचार करता येत नाही. मूक बधिरांनाही शब्द आणि भाषेअभावी विचार करताना मर्यादा पडतात अमूर्त पातळीवर विचार करण्यासाठी भाषा भक्कम असली पाहिजे, शब्दांची श्रीमंती असली पाहिजे, भाषेवर प्रभुत्व असले पाहिजे. विचारशक्ती श्रेष्ठ असली पाहिजे, ती असली की आकलन आणि प्रकटीकरण आपोआपच प्रभावी होते. बौद्धिक विकास शेवटी भाषाविकासाशी निगडीत असतो. माणसाच्या वैचारिक विकासात भाषेचा वाटा मोलाचा आहे.

म्हणून प्रस्तुत संशोधनात आशयघटक विचारानुसार पाठ्यांशाचे पाठनियोजन करुन शिक्षण प्रशिक्षणार्थीच्या अध्यापनात कोणता फरक पडतो हे पाहण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### ३.४.३.७ विचारप्रक्रियेचे शैक्षणिक महत्त्व

विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे विचार करण्यास प्रवृत्त करणे हे शिक्षणाचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे विचार करण्याची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे.

१) अध्यापनात उद्‌गामी व अवगामी पद्‌धतीचा उपयोग केला पाहिजे. भूमितीमध्ये त्रिकोणाचे गुणधर्म शिकविताना अनेक त्रिकोण काढून त्यांचे निरीक्षण करण्यास सांगावे व मगच निष्कर्ष काढू दयावे. व्याकरण शिकविताना मुलांकडून व्याख्या तयार करुन घ्याव्यात.

२) निरीक्षण कसे करावे याबाबत मुलांना मार्गदर्शन करावे. निष्कर्ष काढण्यापूर्वी सर्व बाबींचा बारकाईने विचार करण्याची सवय मुलांना लावावी.

३) जिथे जिथे शक्यता असेल तेथे तेथे विद्यार्थ्यांसमोर समस्या उभी करुन त्यांच्या विचारांना गती द्‌यावी.

४) भावनांचा पगडा आपल्या विचारांवर होणार नाही अशी शिकवण मुलांना द्‌यावी.

५) काकतालीय न्यायाने काही वेळा घटना घडतात. त्यामध्ये कार्यकारण संबंध जोडताना विशेष दक्षता घेतली पाहिजे.

६) शिक्षकांनी आपली मते मुलांवर लादू नयेत.

७) प्रत्येक विषयामध्ये चिकित्सक वृत्तीला अवसर असतो. अध्यापनात त्यादृष्टीने पुरेपूर फायदा घेतला पाहिजे. त्यामुळे विचारशक्ती विकसित होईल.

८) अध्ययनार्थ्यांच्या भाषाविकासाकडे आणि अनुभव समृद्‌धीकडे अधिक लक्ष पुरवावे.

९) संबोध निर्माण करताना ज्ञाताकडून अज्ञांताकडे, मूर्ताकडून अमूर्ताकडे या सूत्रांचा वापर करावा.

१०) अध्यापनात प्रश्नोत्तर पद्धती, चर्चा पद्धती, प्रकल्प पद्धती, स्वाध्याय पद्धती, संशोधन पद्धती इत्यादी पद्धतीचा अवलंब करुन विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करण्यास व ज्ञान संपादन करण्यास मदत करावी.

या सदरच्या संशोधनामध्ये प्रायोगिक गटामध्ये आशय घटकानुसार पाठनियोजन केले तर नियंत्रित गटासाठी पारंपरिक पद्धतीने पाठनियोजन पुढीलप्रमाणे केले होते.

| प्रायोगिक गट<br>अ | नियंत्रित गट<br>ब |
|---|---|
| १) मार्गदर्शन<br>या गटातील विद्यार्थ्यांना आशयघटक कल्पना, भावना, विचार यानुसार मार्गदर्शन केले | मार्गदर्शन<br>या गटातील विद्यार्थ्यांना पारंपरिक पद्धतीने मार्गदर्शन केले |
| अ) कल्पना<br>पाठ्यांशातील प्रतिमा निर्मिती, प्रतिमेचे विश्लेषण, संयोजन, नवीन कल्पनेची निर्मिती, कल्पनेची शृखला त्याचबरोबर शैक्षणिक साहित्य व संदर्भ साहित्य इत्यादी गोष्टीसाठी मार्गदर्शन केले. याशिवाय पाठातील नवीन शब्द, वाक्प्रचार, मूल्यमापन इत्यादी विषयी मागदर्शन केले | पाठातील नवीन शब्द वाक्प्रचार, मूल्यमापन शैक्षणिक साधन, संदर्भ साहित्य इत्यादी विषयी मार्गदर्शन केले. |
| ब) भावना<br>पाठ्यांशातील परिस्थितीचे आकलन, तिचा अर्थबोध, भावनादर्शी कृती कशी करावी, भावनेची निर्मिती त्याचबरोबर अभिनय, आवाजातील चढउतार तसेच विद्यार्थ्यांचा वैयक्तिक क्षमता विकास व त्यांचा सामाजिक क्षमता विकास यासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य तसेच संदर्भ साहित्य याविषयी मार्गदर्शन केले. याशिवाय पाठातील नवीन शब्द, वाक्प्रचार मूल्यमापन इत्यादी विषयी मार्गदर्शन केले | पाठातील नवीन शब्द वाक्प्रचार, मूल्यमापन शैक्षणिक साधन, संदर्भ साहित्य इत्यादी विषयी मार्गदर्शन केले. |
| क) विचार<br>पाठ्यांशातील पूर्वानुभवावर आधारित गोष्टींचा विचार, पाठातील समस्या, तिचे विश्लेषण, संश्लेषण, उपाय तसेच शैक्षणिक साहित्य व संदर्भ साहित्य याविषयी मार्गदर्शन केले. याशिवाय पाठातील नवीन शब्द, वाक्प्रचार मूल्यमापन इत्यादी विषयी मार्गदर्शन केले | पाठातील नवीन शब्द वाक्प्रचार, मूल्यमापन शैक्षणिक साधन, संदर्भ साहित्य इत्यादी विषयी मार्गदर्शन केले. |

## पाठ टाचण तयारी

| | |
|---|---|
| १) प्रस्तावना<br>कल्पना<br>या आशय घटकाला पोषक अशी प्रस्तावना पूर्वज्ञानावर आधारित प्रश्न विचारुन कधी कथन करुन तर कधी चित्र दाखवून करावी असे सुचविले | १) प्रस्तावना<br>पाठ्यांशानुसार पूर्वज्ञानवर आधारित प्रस्तावना करावी असे सुचविले |
| २) हेतुकथन<br>पाठ्यांशाचा उल्लेख करुन स्पष्टपणे करुन हेतुकथन केले. | २) हेतुकथन<br>पाठ्यांशाचा स्पष्टपणे उल्लेख करुन हेतुकथन केले. |
| ३) विषय प्रतिपादन<br>लेखन परिचय<br>जन्म, मृत्यू प्रमुख साहित्यकृती त्यांची वैशिष्ट्ये थोडक्यात तोंडी सांगितला. | ३) विषय प्रतिपादन<br>लेखन परिचय<br>जन्म, मृत्यू, प्रमुख साहित्यकृती, त्यांची वैशिष्ट्ये थोडक्यात सांगितला. |
| प्रकट वाचन<br>स्पष्ट, अचूक वाचनात चढउतार, भावपूर्णता, आशयानुसार आवाजात बदल विरामचिन्हांचा वापर इत्यादीचा काळजीपूर्वक वापर करावा. | प्रकट वाचन<br>आवाजात चढ-उतार, विरामचिन्हांचा योग्य वापर करुन वाचावे. |
| स्थूल चर्चा<br>आशयघटक कल्पना, भावना, विचार यानुसार हेतुप्रश्न विचारावा. यानुसार पाठ्यांशाची मध्यवर्ती कल्पना चार ते पाच वाक्यात सांगितली. | स्थूल चर्चा<br>पाठातील मध्यवर्ती कल्पना यावर हेतुप्रश्न विचारावा. तसेच चार ते पाच वाक्यात पाठाची मध्यवर्ती कल्पना सांगितली. |
| सूक्ष्म चर्चा<br>यात आशय घटक कल्पना, भावना, विचार यांचे त्या पाठाप्रमाणे सर्व पैलू बारीक सारीक विशेषासह सांगावेत. तसेच पाठातील ध्वन्यर्थ, गर्भित अर्थ, नवीन शब्द, वाक्प्रचार, म्हणी इ.सर्वांचा यात समावेश केला. | सूक्ष्म चर्चा<br>यात पाठातील ध्वन्यर्थ, गर्भित अर्थ, नवीन शब्द वाक्प्रचार, म्हणी इ. सर्वांचा समावेश होतो. यात समावेश केला. |

| | |
|---|---|
| ४) संकलन<br>आशय घटक कल्पना, भावना व विचार कशाप्रकारे पाठातून व्यक्त झाले आहेत हे सांगून संकलन केले. | ४) संकलन<br>पाठाची मध्यवर्ती कल्पना सांगून पाठाचे संकलन केले. |
| मूल्यमापन<br>पाठाची उद्दिष्टे तसेच आशय घटक कल्पना, भावना, विचारानुसार प्रश्न विचारुन मूल्यमापन केले. | मूल्यमापन<br>पाठातील उद्दिष्टानुसार प्रश्न विचारुन मूल्यमापन केले. |
| स्वाध्याय<br>पाठातील आशय घटक कल्पना, भावना व विचार यांना पोषक असा स्वाध्याय दिला. | स्वाध्याय<br>पाठाला आवश्यक उपक्रम अशा स्वरुपाचा स्वाध्याय दिला. |

दोन्ही गटातील शिवाजी विद्यापीठ मान्यता असल्यामुळे पाठ टाचन वापरले. प्रचलित सात पायऱ्यांचा उपयोग केला. विषय मांडणीमध्ये, प्रतिपादनामध्ये तसेच सदरीकरणामध्ये फरक होता.

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या इयत्ता आठवीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकामध्ये आशय घटकानुसार विभाजन केले असता ते पुढील प्रमाणे आहे.

## आशय घटकानुसार पाठ्यपुस्तकाचे विभाजन

| अ.क्र. | आशय घटक | पाठ्यांश संख्या गद्य व पद्य | एकूण संख्या | (%) टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | कल्पना | ० + ६ | ६ | १७.६५% |
| २ | भावना | ८ + ६ | १४ | ४१.१८% |
| ३ | विचार | ११ + ३ | १४ | ४१.१८% |
| | | | ३४ | १००% |

तक्ता क्र.३.१

वरील विभाजनावरुन असे लक्षात येते की, आठवीच्या मराठी पाठ्यपुस्तकामध्ये भावना व विचार या आशय घटकांना समान स्थान दिले आहे. तर कल्पना या घटकाला तुलनेने कमी स्थान मिळालेले आहे.

## ३.५ समारोप

या प्रकरणामध्ये आशय घटकानुसार नियंत्रित गटाच्या व प्रायोगिक गटाच्या पाठनियोजना संबंधीची माहिती दिली आहे. तसेच संशोधनासाठी निवडलेले आशयघटक कल्पना, भावना व विचार या संबंधीची माहिती दिली आहे.

पुढील प्रकरण चार मध्ये संशोधनाची कार्यपद्धती विषयी माहिती दिली आहे.

## संदर्भ

१) शेटकर, गणेश व जोशी, शोभना. (२०००). पाठनियोजन मृण्मयी प्रकाशन, औरंगाबाद.(पान नंबर - २० )

२) तत्रएव. ( पान नंबर २०)

३) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (२००३). पाठनियोजन कौशल्ये, नाशिक.(पा.नं.१३)

४) सरपोतदार पी.ए.भोसले ए.व्ही.सांगळे के.एन. (२००२) आशययुक्त अध्यापन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पान नंबर ४७)

५) तत्रएव. (पा.नं.४७)

६) तत्रएव. (पा.नं.४७)

७) तत्रएव. (पा.नं.४७)

८) तत्रएव. ( पान नंबर ५३)

९) करंदीकर, सुरेश (२००६) शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (पा.नं.२७०)

१०) तडसरे, वि.दि. (२००६) मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर ( पान नंबर ९० )

११) तत्रएव ( पान नंबर ९० )

१२) सोहनी, शं.कृ. (१९९३). शैक्षणिक टीपाकोश ( पान नंबर )

१३) गाजरे, रा.वि. व चिटणीस, अशुमती (२००६) अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र आणि मानसशास्त्रीय प्रयोग, नित्य नूतन प्रकाशन, पुणे ( पान नंबर २२७ )

१४) तत्रएव. ( पान नंबर २२८ )

१५) नानकर, प्र.ल. व शिरोड, संगिता (२००५). सुबोध शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, नित्य नूतन प्रकाशन, पुणे ( पान नंबर २६४ )

१६) तत्रएव. ( पान नंबर २६४ )